मौलिक विचार माला - २५

श्रीगुलाबरावमहाराजांचा

धर्मसमन्वय-विचार

हिंदुधर्माचा सर्वसमावेशक उदार भूमिका

डॉ.कृष्ण माधव घटाटे

*

श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ दहीसाथ अमरावती

रु.१०

(२)

श्रीगुलाबरावमहाराज

(इ.स.१८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेला ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञ अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी सर्वसमावेशक माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

(३)

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला. आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले. ०००

॥ सर्वस्पर्शी प्रज्ञावंत ॥

१ वेद-द्रष्टा : वेदमंत्राना हृदयात पहाणारे
० वेद-श्रोता : ध्यानयोगात वेदमंत्र ऐकणारे
० वेद-मीमांसक : विरोधपरिहार करणारे
२ सूत्रकार ऋषी ९ सूत्रग्रंथ
३ षड्दर्शनांवरील भाष्यकार
४ भक्त्याचार्य : भक्तिशास्त्र-निर्माते
५ ज्ञानेश्वरमधुराद्वैतदर्शन-निर्माते
६ धर्माचार्य : धर्माचे स्वरूप उकलून दाखविणारे
७ पुराणाचार्य :सूत्ररचना
८ सांख्यदर्शनाचार्य : ६ ग्रंथ
९ योगदर्शनाचार्य : १० ग्रंथ
१० न्यायदर्शनाचार्य:ग्रंथलेखन
११ पूर्वमीमांसाचार्य : २ ग्रंथ
१२ आयुर्वेदाचार्य : ८ ग्रंथ
१३ संगीताचार्य : २ ग्रंथ
१४ वृत्त-रचनाकार
१५ छंद-रचनाकार
१६ सिद्धहस्त ग्रंथकार
१७ कीर्तनकार :१८आख्याने
१८ लोकगीतकार : तुंबडी,स्त्रीगीते
१९ लावणीकार
२० नाटककार

(४)

२१ आत्मचरित्रकार
२२ समन्वयमहर्षी : धर्म-दर्शन-शास्त्रे
२३ काव्यशास्त्रनिर्माते
२४ नवीन भाषानिर्माते : नावंग भाषा
२५ व्याकरणनिर्माते
२६ नवीन लिपी निर्माते
२७ क्रीडा निर्माते : मोक्षपट
२८ विज्ञानाला दृष्टी देणारे
२९ मानसशास्त्राला दृष्टीदेणारे
३० इतिहासाला : दृष्टी देणारे
३१ चमत्कार-निषेध करणारे
३२ नीतिशास्त्रज्ञ : तुलना पाश्चात्य व भारतीय
३३ कवी व गायक
३४ लोक-शिक्षक
३५ स्त्री-शिक्षक
३६ बाल-शिक्षक
३७ अभंगकार - २१५२
३८ संगीतपदकार - २२४४ **(संस्कृत पदे ४१)**
३९ श्लोक-१००० **(संस्कृत-मराठी)**
४० ओव्या-२३०००च्या वर
४१ गद्यपद्य पत्रे ११८ - **(संस्कृत ११पत्रे)**
४२ ग्रंथरचना १३९ **(संस्कृत-३१रचना)** मराठी- वऱ्हाडी- हिंदी-३रचना एकूण पृष्ठे-७००० ।।।।।

*
श्रीरंग घटाटे
'गोकुळ'घटाटे,लेआउट,
सिव्हिल-लाईन,नागपूर.
मो.९३७२५२९७७०,
टे.०७१२-२५३३९९७

*
श्रीगुलाबरावमहाराज
भक्तिधाम
चांदूरबाजार
जि.अमरावती.
टे.२७७२-२४३१३१

*
नारायण मोहोड
ज्ञानेशनंदिनी, आळंदी
(देवाची) जि.पुणे
मो.९८२२४४०५९१.
९४२३००६२०८.

(५)

श्रीगुलाबरावमहाराजांनी स्पष्ट केलेला

सर्व धर्म समन्वय

*

सर्व धर्मांना आधार असलेली भूमिका

***

धर्मचर्चा हा विषय अतिशय अवघड आहे. श्रीगुलाबराव महाराजांनी संतांच्या भूमिकेतून या विषयाचा ऊहापोह केला आहे. तो महत्वाचा आहे कारण संत, विद्वान आणि धर्मपंडित यांच्या वैचारिक भूमिकांत मूलभूत फरक असतो. विद्वानपंडितांसमोर व्यक्तिगत किंवा सामाजिक अडचणी आल्या तर ते पूर्वी अस्तित्वात असलेल्या धर्मशास्त्रातील विधिनिषेधांवरून निवाडा देतात, पण नवा मार्ग सांगू शकत नाहीत. परंतु संत मात्र स्वात्मानुभवी व नवीन प्रक्रिया सांगण्यामध्ये प्रवीण असल्यामुळे पूर्वीच्या धर्माला अनुसरून पण वेगळा असा नवा मार्ग सांगतात. जुन्या शास्त्रांची नवीन योजना करतात. म्हणूनच एखादा परधर्मी आपल्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी सत्पुरुषाजवळ आला तर त्याचा स्वतःचा आचार कायम ठेवून वैदिक धर्मातील आत्मानुभूतीचा मार्ग

(६)

सत्पुरुष त्याला सांगतात. तसेच पतितालाही त्याचा आचारधर्म अधिकार-वाणीने सांगून नवीन परमार्थ प्रक्रिया रचून देतात. पंडितांजवळ अनुभूती नसल्यामुळे जुन्या शास्त्रांवरून ते निवाडा देऊ शकतात पण पतिताला किंवा परधर्मियाला अनभूतिमार्ग सांगू शकत नाहीत. पतिताला प्रायश्चित देऊ शकतात पण त्याचा धर्म त्याला आत्मविश्वासाने सांगू शकत नाहीत. पतिताच्या अधिकारानुसार आचार आणि अनुभवाच्या प्रक्रिया शिकवूं शकत नाहीत. पंडितांना धर्माचा किंवा पंथाचा समन्वय करण्याची पाळी आली तर ते त्या त्या मतांच्या पायऱ्या कल्पून अद्वैत सिद्धांताला किंवा स्वतःच्या सांप्रदायिक सिद्धांताला उच्च ठरवितात किंवा इतर सर्वांना सर्वथैव चूक ठरवितात. (हा मध्यम समन्वय होय) परंतु संत मात्र अद्वैत सिद्धांताला उपजीवक व इतरांना उपजीव्य ठरवून उत्तम समन्वय करतात.

''अधिकारानुसार धार्मिकाला, पतिताला किंवा परधर्मियाला आचारधर्म व अनुभूतिमार्ग आत्मविश्वासाने सांगू शकणे आणि शास्त्रानुसार केवळ निर्णय देणे'' हाच संताच्या आणि पंडितांच्या भूमिकेतील महत्वाचा फरक आहे.

(७)

या दृष्टीने विचार केला असता महाराजांनी केलेली धर्मचर्चा ही अतिशय मोलाची आहे असे दिसून येईल. त्यांनी दिलेली समन्वयाची दृष्टी सर्व संप्रदायांचा अविरोध साधून परस्परातील विद्वेषाचा निरास करणारी असून शेवटी परमार्थ साधून देणारी आहे. ही समन्वयदृष्टी महाराजांच्या समग्र वाङमयातून जागोजागी व्यक्त झालेली आहे. धर्म शब्दाची व्याख्या पाहिली असता -

यतो अभ्युदय निश्रेयससिद्धिः स धर्मः।। वैशेषिक दर्शन.
धारणात् धर्म इत्याहुः।।

ज्यामुळे लौकिक अभ्युदय होईल आणि मोक्षप्राप्ती देखील होईल तो धर्म! असा धर्म समाजाची धारणा करतो म्हणजे संपूर्ण मानव समाजाला परस्पर विद्वेष नाहीसा करून सुव्यवस्थित टिकवून धरतो. धर्मामुळे समाजातील व्यक्तींचे परस्पर सामंजस्य उत्पन्न होऊन प्रत्येकाला आंतरिक समाधानही लाभते. सद्‌गुणांचा विकास होतो आणि शेवटी समाजातील कोणत्याही व्यक्ती परमार्थपटाच्या अधिकारी होऊ शकतात. हे सर्व धर्मांचे मूळतत्त्व आहे. परंतु ते तत्त्व हिंदूधर्मातच चांगल्या रीतीने स्पष्ट झालेले आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांची व्यवस्था याच दृष्टीने आहे. यापैकी -

(८)

* अर्थ आणि काम हे पुरुषार्थ इहलोकात सुख देणारे,

* धर्म पुरुषार्थ व्यवहारात मानसिक समाधान आणि परलोकात उत्तम गती देणारा, आणि

* मोक्ष हा पुरुषार्थ सर्व दुःखांपासून पूर्णपणे मुक्त करणारा आहे.

याप्रमाणे, कमीजास्त प्रमाणात, बाकीच्या सर्व धर्मांचे ध्येयही शेवटी परमेश्वरप्राप्ती हीच आहे. परंतु निरनिराळ्या प्रत्येक धर्मात किंवा पंथात आचारधर्मांची भिन्नता आणि तत्त्वज्ञानांचीही भिन्नता असते. ईश्वर सगुण की निर्गुण यासंबंधी वाद असतात. परंतु या सर्व भिन्नतेंचा विचार महाराजांनी अधिकारभेदानुसार करून, धर्माच्या मूळ तत्त्वानुसार समन्वय केला आहे.

लौकिक अभ्युदय आणि परमार्थिक मोक्ष प्राप्त करून देणारा तो धर्म. ही व्याख्या मुख्यतः हिंदुधर्मालाच लागू होते. इतर धर्मांमध्ये लौकिक अभ्युदय आणि पारलौकिक स्वर्गादि सुख या दृष्टीनेच प्रामुख्याने विचार आलेला आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानांत मोक्षाचा विचार देखील नाही, असे म्हटले तरी चालते.

(९)

परंतु महाराजांच्या मते इतर धार्मियांना देखील - स्वतःचा धर्म निष्ठेने पालन केल्याने - पुढील जन्मी उच्च धर्म मिळून, शेवटी परंपरेने हिंदू धर्माची प्राप्ती होऊन. मोक्ष मिळेल; किंवा एखाद्याला ख्रिश्चन मुसलमान धर्मात असूनही मोक्षाची इच्छा झाल्यास व त्याने हिंदुधर्मातील तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यास मोक्षप्राप्ती सुलभ आहे.

इतर अभारतीय धर्मात आचारधर्म आणि लौकिक समाजव्यवस्था यांनाच अधिक महत्व असून तत्त्वज्ञानाचा विचार मुळीच नाही. पण असे असूनही त्यांच्यातील महात्मे हे मात्र परमेश्वराच्या कृपेने तीव्र मुमुक्षप्राप्त होऊन श्रेष्ठ पदवीपर्यंत पोचलेले आहेत. पण आपल्या अनुभवांचे तात्त्विक विवेचन करून त्या महात्म्यांनी मोक्षविचार मांडलेला नाही. याचे कारण असे की त्यांनी आपल्या भोवतालच्या लोकांचा अधिकार पाहून त्या लोकांच्या योग्यतेनुसार शिकवण दिली. ही शिकवण मुख्यतः व्यावहारिकच राहिली. त्याबरोबरच त्या त्या समाजाची प्रगती होण्यासाठी ईश्वरोपासनाही प्रवृत्त केल्या. परंतु पुढे युरोपात नवीन विचारवतांनी त्यांच्या आत्मानुभावाला मिस्टीसीझम् संबोधून यौक्तिक तत्त्वज्ञानाच्या प्रांतातून बहिर्भूत केले.

(१०)

ही परिस्थिती हिंदुधर्मात मात्र झाली नाही कारण येथे तत्त्वज्ञान आणि धर्म यांची नेहमी सांगडच घातली गेली आहे. त्यामुळे सायन्स कितीही वाढले तरी हिंदु धर्माच्या मूळ तत्त्वाला धक्का लागू शकत नाही.

उलट, युरोपात मात्र सायन्सची प्रगती झाल्या बरोबर ख्रिश्चन वगैरे पाश्चात्य धर्मांची स्थिती अत्यंत दयनीय झाली. पाश्चात्यांनी स्वतःच्या धर्माच्या तात्त्विक स्वरूपाचा अभ्यास परंपरेने चालू ठेवला असता - किंवा सर्वांना प्राचीन असलेल्या मूळ वैदिक धर्मापासून सुसूत्रता कायम ठेवल्या गेली असती तर आजची अवनतीची अवस्था आली नसती. ख्रिश्चन, मुसलमान वगैरे सर्वच पंथ किंवा धर्मांचा फिलॉसॉफिकल संबंध कायम राहिला असता तरी देखील सायन्सच्या प्रगतीमुळे धर्माची अवनती झाली नसती. हे समजून घेण्यासाठी धर्म आणि पंथ यांचा मुळातून विचार करणे जरूर आहे. त्यासाठी महाराजांनी दाखवूनदिलेली गाइडलाईन महत्वाची आहे.

धर्म आणि पंथ

धर्म हा व्यापक असतो. पंथ किंवा संप्रदाय हे त्या धर्माच्या एकेका अंशावर स्थित असतात. जसे

(११)

हिंदुधर्माचे स्वरूप फार विस्तृत आहे त्यात कर्ममार्ग, उपासनामार्ग, योगमार्ग, ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग वगैरे अनेक निरनिराळे मार्ग आहेत. हे सर्व मार्ग भिन्न भिन्न असले तरी ते मूळ वैदिक धर्मातील कोणत्यातरी तत्त्वांना धरून आहेत.

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान् सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्यः विजानतः॥४६॥ गीता

- ''वेदात पुष्कळ सांगून ठेवले आहे पण आपण मात्र आपल्याला जे हवे आहे तेवढेच घ्यावे.पिण्याचे पाणी सर्वत्र मिळते पण आपण आपल्या तहानेपुरते पेलाभरच घेत असतो.'' त्याचप्रमाणे हिंदुधर्मातील षड्दर्शने, निरनिराळे संप्रदाय, योगमार्गातील भिन्नभिन्न प्रक्रिया, या सर्वांचाच अभ्यास प्रत्येकाने करण्याची जरूरी नाही. आपल्याला परंपरेने प्राप्त झालेला आचार धर्म आणि बौद्धिक योग्यतेनुसार एखादा संप्रदाय व त्याचे तत्त्वज्ञान येवढेच घेतले की पुरे होते. म्हणून -

''धर्म हा सामान्य रूपाने सर्वच पंथांचे अधिष्ठान म्हणून कायम असतो. त्याचा कोणत्याच संप्रदायाशी विरोध नसतो.''

(१२)

सांख्य, योग, न्याय, मीमांसा, वेदान्त ही षड्दर्शने वैदिक श्रुतींचा आधार घेऊनच आपापले शास्त्र मांडीत असतात. अद्वैती, द्वैती वगैरे सर्व संप्रदाय वैदिकच आहेत. शैव, गाणपत्य, सौर, देवी वगैरे सर्वच पंथात कोणती तरी वैदिक श्रुती प्रमाण घेतलेलीच असते. महानुभाव आचार मानीत नाहीत पण कृष्णोपासना करतातच. शीखांनी ओंकारावरच आपली भिस्त ठेवली आहे. अहिंसा तत्त्वावर जैन संप्रदाय अधिष्ठित आहे. सत्य अहिंसेवर बौद्ध अवलंबून आहेत. याप्रमाणे सर्व संप्रदाय हे वैदिक धर्माच्या एकेका अंशावर स्थित आहेत. म्हणूनच त्यांचा विरोध वरवरचा आहे. परस्परांच्या आचारधर्मात भिन्नता आहे, तत्त्वज्ञानातही भेद वाटतो आणि मूळ विचाराकडे दुर्लक्ष झाल्याने परस्पर विरोधही वाढला;

म्हणून परस्पर सामंजस्य होण्यासाठी आद्य शंकराचार्यांनी अद्वैतज्ञानदृष्टीने सर्वांचे खंडन केले परंतु पुन्हा त्या त्या पंथांच्या आचार्यांना विश्वासात घेऊन तो तो पंथ तसाच कायम ठेवण्यास सांगितले. कारण अद्वैत सिद्धांत हा सर्वांत श्रेष्ठ असला तरी तो आकलन होण्यासाठी सर्व लोकांची पात्रता सारखी नसते. प्रत्येकाच्या

(१३)

अधिकारानुसार त्याला वरच्या वरच्या पायरीवर नेण्यासाठी ÄTÄTpç GœeZEY NÿçÄç ÂçTOçZ **'अधिकार तैसा करू उपदेश'** या श्रीतुकारामांच्या वचनानुसार सर्व संप्रदायातील आचार आणि तत्त्वज्ञान भिन्न भिन्न असणे हेच समाजाच्या आणि व्यक्तीच्या उन्नतीच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

इस्लाम-ख्रिश्चनादिंनी– **एकच धर्मस्थापक, एकच पोथी व एकच आचार,** असे मानल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला पारमार्थिक उन्नती करून घेण्यासाठी स्वतंत्रपणे वाव राहिला नाही. पुनः त्यातून जे भिन्न भिन्न संप्रदाय निघाले त्यांचेही आपसात कट्टर वैर झाले. जसे सुफी व सुन्नी हे मुसलमान संप्रदाय. यांचे झगडे सतत चालूच असतात. ख्रिश्चनांमध्ये प्रोटेस्टंट व कॅथोलिक यांचे कडक वैर आहे. असे आपल्या हिंदू संप्रदायांत फारसे नाही. थोडेसे दिसले तरी ते अनुयायांत दिसते, आचार्यांत दिसत नाही.

''नहि ते मुनयो भ्रान्ताः सर्वज्ञत्वात् तेषाम्'' अशी सर्व आचार्यांची समता परमार्थात मानली गेली आहे. **''माझा स्वतःचा संप्रदाय श्रेष्ठ आहे आणि मला तोच उपयोगी आहे,''** अशी पक्की भावना असली तरी दुसऱ्या सांप्रदायिकांबद्दल द्वेष नाही. –गौणबुद्धी मात्र असूं शकते

(१४)

आणि स्वतःची निष्ठा स्वतःच्या संप्रदायावर राहण्याच्या दृष्टीने, काही मर्यादेपर्यंत ती योग्यही आहे. परंतु यासोबत परस्पर आत्यंतिक द्वेष नसल्यामुळे, हिंदुस्थानातील संप्रदायांनी तलवारीच्या जोरावर आपापले संप्रदाय वाढविण्याचा प्रयत्न केला नाही. भारतात जबरदस्ती, जुलूम आणि आमिष यांच्या बळावर संप्रदाय वाढले नाहीत. उलट शंकराचार्यांनी वाद करून सभा जिंकल्या. इतर आचार्यांनी उपदेश करून आपापले संप्रदाय वाढविले. यामुळे आपल्या देशात ख्रिश्चन, मुसलमान, वगैरे परधर्मानुयायी देखील गुण्यागोविंदाने सन्मानाने राहू शकतात आणि स्वतःचा धर्म पालन करू शकतात. ही परधर्मसहिष्णुता फक्त आर्यधर्मातच आहे आणि ही आजची नसूनअनादिकालापासून चालत आलेली आहे. हे आर्य धर्माचे वैशिष्ट्य आहे. यामुळेच आर्यधर्म सर्वसमावेशक व सहिष्णू झाला आहे. जगातील प्रत्येक मानवाची उन्नती इच्छिणारा आहे.

''मुसलमानांनाच अल्ला स्वर्ग देईल व काफरांना नरक देईल'' असा अतिरेकी विचार हिंदूंमध्ये नाही.

सर्वच मानव ईश्वराने निर्माण केले आणि त्यांचे वेगवेगळे धर्मही ईश्वरानेच निर्माण केले, असे व्यासांनी

(१५)

स्पष्ट सांगून ठेवले आहे आणि हीच भावना प्रत्येक हिंदुमात्राची आहे. आणि म्हणूनच तो हिंदू धर्मदृष्टीने इतरांचा द्वेष स्वभवतः करू शकत नाही. उलट हिंदूंचे संत आपले तत्त्वज्ञान आणि भक्ती यवनादि सर्वांना शिकविण्यास अहोरात्र तयार असतात, मात्र याचा परिणाम व्यावहारिक दृष्टीने विपरीतही झालेला दिसतो. परंतु परधर्मसहिष्णुता याचा अर्थ अन्याय सहन करणे नव्हे. **''तस्मात् युध्यस्व भारत''** हा गीतेतील **'अन्यायाचा प्रतिकार करण्याचा धर्म'** हिंदूंनी सोडला आणि म्हणूनच पूर्वीच्या अफाट विशाल आर्यविश्वाचा संकोच होत गेला. असो.

एकूण काय तर **सर्व धर्मांचे ध्येय अन्ततो गत्वा– जगत्कारणाशी एकरूप होऊन आपली मूळ आत्मस्थिती प्राप्त करून घेणे**, हेच आहे. परंतु ती योग्यता सर्व सामान्य लोकांची नसल्यामुळे अधिकारानुसार मूळ धर्मातील तत्त्वज्ञानाचा थोडा थोडा संकोच करून निरनिराळे संप्रदाय स्थापन केले गेले आहेत. त्या त्या संप्रदायाचे आचरण करून माणसाची उन्नती झाली की आपोआप त्याच जन्मी किंवा पुढील जन्मी त्याहीपेक्षा उच्च मार्गदर्शन मिळून त्याला आत्मस्थिती प्राप्त करून देण्याचे वचन भगवंतांनी गीतेत दिले आहे.

(१६)

ददामि बुद्धियोगं तं ये मामुपयान्ति ते ॥
नहि कल्याणकृत् कश्चिद् दुर्गतिं तात गच्छति ॥

''माझी उपासना करणाऱ्याला मी बुद्धियोग देतो आणि उत्तम कर्म करणारा कधीही दुर्गतीला प्राप्त होत नाही.'' असे भगवंताचे आश्वासन असल्यामुळे आपले सांप्रदायिक आचरण निष्ठेने करावे आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत असावे म्हणजे कार्य भागते. अशी पार्श्वभूमी असलेल्या धर्मात दोन भाग दिसतात. वैदिक आणि अवैदिक.

<u>वैदिक धर्म आणि अवैदिक धर्म</u>

सामान्यतः वैदिक धर्म व त्यांचे संप्रदाय आणि अवैदिक धर्म व त्यांचे संप्रदाय असे दोन विभाग दिसून येतात. वैदिक धर्मात अद्वैती शांकर संप्रदाय व माध्व वगैरे द्वैती संप्रदाय येतात. हे पूर्णपणे वैदिक आहेत. महानुभाव वगैरे संप्रदाय कृष्णाला मानतात तर इतर काही मानीत नाहीत. शिख ओंकाराची उपासना करतात तर त्यांचा इतर आचारधर्म अगदी वेगळाच आहे. याप्रमाणे भारतामध्ये नानाविध संप्रदाय आहेत ते वैदिक किंवा पौराणिक धर्माच्या काही अंशावर स्थित आहेत. त्याचप्रमाणे बौद्ध व जैन हे वेदांना मानीत नाहीत व वैदिक तत्वज्ञानातील

सत्य, अहिंसा, पुर्जन्म, वगैरे मानणारे आहेत त्यामुळे पूर्णपणे अवैदिकही नाहीत.

उलट ख्रिश्चन, मुसलमान यांनी मात्र हिंदूंवर अत्याचार केलेत. जबरदस्तीने हिंदूंचे धर्मान्तर केले. कफिर म्हणून हिंदुधर्माचा सर्वतः द्वेष केला. देवळे उध्वस्त केली. गोहत्या गोमांस भक्षण वगैरे मुद्दाम केले आणि करविले. आज १२०० वर्षांपूर्वी मुसलमान हिंदुस्थानात आले पण एकही वर्ष असे गेले नाही की मुसलमानांनी हिंदूंवर अत्याचार केले नाहीत. त्यामुळे यांना परधर्मीय म्हणूनच हिंदूंनी पाहिले. आपाततः सर्व भारतीय संप्रदायांशी यांचा अत्यंत विरोध दिसतो. आणि त्यांनी प्रत्यक्ष विरोधही केलेला आहे. त्यामुळे यांना संप्रदाय म्हणण्याऐवजी परधर्म समजण्यात आले, यात फारसे वावगे नाही.

परंतु पुराणवचनावरून मात्र परमेश्वरानेच कृपायुक्त होऊन यवन स्थितीला प्राप्त झालेल्या मूळच्या आर्य लोकांना पुनः उन्नतीचा मार्ग दाखवावा, म्हणून अशा अनेक धर्मांची स्थापना केली. यवनधर्मांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास पुनर्जन्म, सत्य, अहिंसा वगैरे अनेक वैदिक तत्त्वांवरच या धर्माची उभारणी झालेली दिसते. परंतु त्यांच्या अनुयायांत स्वधर्माच्या सर्वश्रेष्ठत्वाचा दुराभिमान

व इतरांचा द्वेष हे दुर्गुण प्रामुख्याने आले असल्यामुळे त्यांना व्यापक अशा आर्यधर्मात सामावून घेणे अवघड जाणे स्वाभाविकच आहे. खरोखर पाहिले असता यांची वैदिक धर्माच्या एकांशावर स्थिती असल्यामुळे यांचे हे दोष निघूनगेल्यास यांना आर्यत्व देण्यास हरकत वाटू नये असे वाटते. महाराजही म्हणतात की -

''ही आर्यधर्माचीच रूपे असल्यामुळे यांना मूळ आर्यधर्म शिकविण्यास विशेष प्रत्यवाय नाही.'' आणि म्हणून रामकृष्णादिकांच्या मुसलमान भक्तांना महाराजांनी व इतर संतांनीही योग्य तो सन्मान दिलेला आहे.

अशाप्रकारेवैदिक आणि अवैदिक असे धर्मात दोन भेद असून सूक्ष्म विचार केला असता त्यांचा मूळ वैदिक धर्माशी पूर्णतः विरोध नाही. जसा खालच्या पायरीचा वरच्या पायरीशी विरोध नसतो तर खालची पायरी वरचीला पूरक असते त्याप्रमाणे सर्व धर्मांचा किंवा संप्रदायांचा परस्पर खरा विरोध राहू शकत नाही. असा महाराजांनी केलेल्या विवेचनावरून निष्कर्ष काढता येतो. या निष्कर्षावर पोहचण्याचे कारण महाराजांची समन्वयपद्धती ही होय. तिचा या संदर्भात विचार करून

समन्वय : ९ प्रकार

महाराजांनी उत्तम, मध्यम, अधम व अधमाधम असे समन्वयाचे मुख्य भेद करून त्यांचे एकूण पुनः:नऊ प्रकार केले आहेत. त्यापैकी त्यांनी उत्तम व मध्यम समन्वय यांनाच मुख्य म्हणून मान्यता दिली आहे. ''जर असा समन्वय करता येणार नाही तर शांकरमताचे ग्रहण करून इतर मतांचा परित्याग करावा, उगीच संशयग्रस्त होऊ नये'' अशीही त्यांनी विनंती केली आहे.

उत्तम समन्वय	१) उत्तम २) उपजीव्य-उपजीवक
मध्यम समन्वय	३) उपेक्षारूप ४) अलिप्ततामूलक ५) शिखर
अधम समन्वय	६) प्रयोजन ७) ऐतिहासिक ८) क्लिष्ट
अधमाधम समन्वय	९) संशयरूप

१) उत्तम समन्वय

'मृगजलाच्या पुराचे पाहिजे तसे वर्णनकरता येते, तसे परमेश्वराच्या मायेचा स्वीकार करून कोणत्याही प्रकारचे वर्णन करता येते.असे दृढ समजणे हा उत्तम समन्वय;.

जगातील सर्वच काही मायेचा पसारा असल्यामुळे तिची खोटी स्वरूपे एकमेकांशी काय विरोध करणार, अशी निश्चयात्मक बुद्धी संतांचे ठिकाणी असल्यामुळे, ब्रह्मा अन्वय सर्व संप्रदायात ते पाहतात. तसेच प्रत्येक संप्रदायात ईश्वराचे अस्तित्व मानलेले आहेच. त्यामुळे कोणत्याही संप्रदायात गेल्याने जीवाची उन्नती होणार अशी समबुद्धी (म्ह० ब्रह्मबुद्धी) असल्यानेही महाराजांनी केलेला 'उत्तम समन्वयाचा' प्रकार सर्वश्रेष्ठ आहे यात संशय नाही.

२) उपजीव्य उपजीवक समन्वय

'मांडुक्यकारिकेतील अलातचक्र निरूपणाप्रमाणे उपजीव्यांचा अविरोध साधून शांकर अद्वैतसिद्धांताला उपजीवक करणे हाही उत्तम समन्वयच म्हणावा.'

अग्नीची एकच ज्योत गोल फिरविली असता अग्नीचे वर्तुळ दिसून येते. हा दृष्टिभ्रम आहे. यालाच अलातचक्र म्हणतात. त्याचप्रमाणे एकच शांकर अद्वैतसिद्धांत, सर्व संप्रदायातील तत्त्वज्ञानात, 'अन्ततो गत्वा' प्राप्तव्य आहे. उपजीव्य आणि उपजीवकांचा विरोध नसतो त्याप्रमाणे अद्वैतसिद्धांताचा व इतर संप्रदायातील

तत्त्वज्ञानांचा विरोध नाही. अद्वैतच द्वैतरूपाने भासते. अधिकार भेदानुसार प्रत्येकाला वेगवेगळा उपदेश असला तरी शेवटी त्या सर्वांना अद्वैताचीच प्राप्ती होणार असते.

समुद्राच्या एका लाटेत बुडी दिली असता समुद्रातच स्नान होते, त्याप्रमाणे कोणत्याही संप्रदायाचा आश्रय केला असता शेवटी निष्ठेच्या बळावर परब्रह्मीच प्राप्ती होत असते. कबीर, रामानुज, मध्वाचार्य, गुरु नानक, चैतन्यमहाप्रभू या सर्वांनी निरनिराळे संप्रदाय स्थापन केले असले तरी ते स्वतः आणि त्यांचे कृतार्थ झालेले शिष्य पूर्ण ब्रह्मानुभवीच झाले. आणि म्हणूनच भक्तांनी गायिलेल्या भक्तांच्या चरित्रात भिन्न भिन्न संप्रदायातील साधूंची भक्त म्हणूनच स्तुती केलेली आढळते. हा उपजीव्य उपजीवक समन्वय' होय.

<u>३) उपेक्षारूप समन्वय : मध्यम</u>

'जीवन्मुक्तांच्या मौनाला साधक असलेला उपेक्षारूप समन्वय'

पहिल्या उत्तम समन्वयात व या उपेक्षारूप समन्वयात भेद आहे. जीवाच्या अधिकाराप्रमाणे दिलेल्या प्रक्रियेनुसार, जीवांचा उद्धार करण्यासाठी असलेले भिन्न भिन्न सांप्रदायिक तत्त्वज्ञान हे (मायेच्या स्वीकारामुळे) त्या

त्या अधिकाऱ्यांच्या उद्धारासाठी योग्यच आहेत, अशी पहिल्यात भावना असते. लोकांचा उद्धार करण्याची इच्छा असते. पण जगाची व त्यातील लोकांची काही महात्मे उपेक्षा करीत असतात. त्या जीवन्मुक्तांचा संसाराशी विरोध असतो किंवा लोकांना सुधारण्याची इच्छा त्यांना नसते. ते अखंड जीवन्मुक्तीचे सुख भोगण्यात निमग्न असतात. त्यांना लोक तरले काय किंवा बुडाले काय? याची चिंता नसते. म्हणूनते सांप्रदायिक-तत्त्वज्ञानांची उपेक्षा करतात. 'ब्रह्म सत्यं जनन्मिथ्या' या भावनेने जगाला मिथ्या समजत असतात. म्हणून जगातील लोकांचा उद्धार करणाऱ्या इतर सांप्रदायिक तत्त्वज्ञानांचीही उपेक्षा करून मौन ठेवतात. हाच उपेक्षारूप समन्वय.

पहिल्या दोन समन्वयांचा उपयोग लोकांच्या उद्धारासाठी होतो तर उपेक्षारूप समन्वयाचा उपयोग जीवन्मुक्तिसुख भोगण्यासाठी असतो. म्हणून या उपेक्षारूप समन्वयाला महाराजांनी मध्यम म्हटले आहे.

<u>४) अलिप्ततामूलक समन्वय : मध्यम</u>

'चार्वाकावाचून इतर सर्वांनाच यमनियमादिक मान्य असल्यामुळे विवाद कशाला करावा, अशा स्वरूपाचा समन्वय मध्यमच होय'

यमनियम सर्व संप्रदायात सारखेच असल्यामुळे आपोआप त्यांच्या पालनामुळे त्या त्या सांप्रदायिक मंडळींची उन्नती होणारच आहे. आणि पुढे मुंगीच्या गतीने कां होईना पण त्यांना परमप्राप्ती होईलच असे समजून वादापासून दूर राहणे हाही मध्यम समन्वय होय. यात उपेक्षा नसून अलिप्तता असते. उपेक्षेत तुच्छबुद्धी असते. यात तुच्छबुद्धी नसते.

<u>५) शिखरसमन्वय : मध्यम</u>

' त्या त्या मतांच्या पायऱ्या लावून शांकरमताला शिखरभूत करणे.'

अमुक संप्रदाय खालच्या पायरीचा, हा त्याहून वरचा, मग द्वैत संप्रदाय व शेवटी अद्वैत संप्रदाय अशा एकापेक्षा एक चढत्या पायऱ्या लावून सर्वोच्च स्थान शांकर अद्वैताला देणे हा मध्यम समन्वय आहे. याचे कारण या समन्वयात एकाला गौण व एकाला उच्च समजण्यात येते. खालच्या संप्रदायांच्या ठिकाणी तुच्छ बुद्धी असते किंवा 'उपजीव्य उपजीवक समन्वयाप्रमाणे समभावना' नसते म्हणून हा मध्यम समन्वय होय.

<u>६) प्रयोजन समन्वय : अधम</u>

'कोणतेही प्रयोजन मनामध्ये घेऊन समन्वय करणे'

आपल्या मनात एखादा उद्देश घेऊन त्यानुसार सर्व संप्रदायात ते तत्त्व आहे की नाही हे पाहून त्यानुसार समन्वय करणे, असे याचे स्वरूप असते.

<u>७) ऐतिहासिक समन्वय : अधम</u>

'ऐतिहासिक दृष्टीने केलेला समन्वयही अधमच असतो'

<u>८) क्लिष्ट समन्वय : अधम</u>

'न समजणाऱ्या वाक्यांचा एखादा उद्देश मुद्दाम काढून त्यानुसार समन्वय करणे' याला क्लिष्ट समन्वय म्हणतात.

<u>९) अधमाधम समन्वय</u>

'श्रद्धेच्या बळावर सिद्धांताविषयी संशयात्मक विधान करणे तो अधमाधम समन्वय होय.'

सिद्धांताविषयीच संशय व्यक्त करणे याहून भयंकर वाईट असे काहीही नाही म्हणून याला अधमाधम समन्वय म्हटले आहे.

या सर्वां पैकी उत्तम आणि मध्यम समन्वयाचे पांच प्रकारच महाराजांनी स्वीकार्य केले आहेत. अधम आणि अधमाधम समन्वय त्याज्य ठरविले आहेत. यातही असे दिसून येते की पहिले दोन समन्वय आत्मानुभवी सत्पुरुषांच्या ठिकाणी सहज दिसून येतात व तिसरा

उपेक्षारूप समन्वय मिथ्योन्मादग्राही असलेल्या जीवन्मुक्तांचे ठिकाणी दिसून येतो. साधकांना हे समन्वय प्रयत्नपूर्वक करावे लागतात म्हणून यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

एकूण समन्वयाचे ९ प्रकार महाराजांनी नव्याने सांगितले आहेत. त्यापैकी कोणत्याही ५ प्रकारातून समन्वय केल्यानंतर उगीच संशयग्रस्त होऊ नये अशी त्यांनी विनंती केली आहे. कारण 'संशयात्मा विनश्यति' असे गीतावचन आहे. यासंबंधी त्यांनी 'शास्त्रसमन्वय' या प्रकरण ग्रंथात विस्ताराने विवेचन केले आहे.

सर्व शास्त्रांमध्ये दोन प्रकारची तत्त्वे असतात.

* पहिले केवळ श्रद्धेने समजणारे **'आर्ष तत्त्व'** हे ऋषींपासून परंपरेने प्राप्त झालेले असते म्हणून आर्ष होय.
* दुसरे, लोकांना बोध होण्यासाठी युक्तीनेसिद्ध होणारे असे **'यौक्तिक तत्त्व'** होय.

या दोन्ही तत्त्वांचा समन्वय मनन-चिंतन केले असता होतो. अनेक संप्रदायातील तत्त्वांचा समन्वय केला तरीही - ''त्या त्या संप्रदायातील तत्त्वे भिन्न भिन्नच असून त्यांचा नित्य विरोधच आहे,'' असा जर कोणाचा आग्रहच असेल तर ती व्यक्ती ''असूयेने ग्रस्त'' आहे समजावे. सद्‌गुणांच्या ठिकाणी मुक्त विरोध हुडकून त्यालाच महत्व

देणे हीच असूया होय.

सर्व लोकांची बुद्धी सारखीच नसते, म्हणून निरनिराळ्या लोकांना पटवून देण्यासाठी नाना प्रकारच्या प्रक्रिया सत्पुरुष सांगत असतात. त्यामुळे मुनींना निरनिराळे संप्रदाय स्थापन करावे लागले. त्यांचा अंतिम उद्देश मात्र एकच आहे. तो म्हणजे जीवाला ब्रह्मरूप करणे. सर्व ऋषी अनुभूतीसंपन्न, भ्रांतिवर्जित आणि सर्वज्ञ असल्यामुळे त्यांच्याकडून होणारा उपदेशही भ्रांतिवर्जित आणि ब्रह्मानुभव आणून देणारा असाच असतो. पण आपली त्यांचे ठिकाणी आत्यंतिक श्रद्धा आणि समन्वय दृष्टी असावी लागते हेही तेवढेच महत्वाचे आहे. प्रत्येक संप्रदायातील विशेष गोष्टी सोडून दिल्या तर त्यात सामान्यरूपाने अद्वैत ब्रह्माचे स्वरूपच दिसून येते. उपासना करीत असताना जेव्हा उपासक उपास्याच्या ठिकाणी तदाकार होतो, त्यावेळी जीवब्रह्मैक्यच होत असते. समाधीत सर्वांना एकच ब्रह्मानुभव येत असतो. पण पुनः व्युत्थान झाले असता, ते अनुभवी सत्पुरुष इतर लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार भिन्न भिन्न उपदेश करतात. सर्व शास्त्रांमध्ये एका ब्रह्मालाच गायिलेले आहे, तेच सर्व

शास्त्रांचे प्राप्तव्य आहे. हे जर कळले तर मग भेद आणि द्वेषभावना राहतच नाही.'सकळ शास्त्रांची अनोळखी फिटे'.ज्ञा. अशी स्थिती असते.

सर्व शास्त्रांचे मूळ स्थान एकच आहे. ती सर्व सख्खी भावंडे आहेत. असे कळल्यानंतर सर्व मोह विलयाला जातो. महाराज म्हणतात.- अद्वैतनिष्ठ असो की विशिष्टाद्वैतनिश्चयी असो, तो भगवंताचा दास असेल तर परब्रह्म स्थिती मिळविणारच!

अद्वैतद्वैतनिष्ठो वा विशिष्टाद्वैतनिश्चयी ।
हरेर्दासः परं याति हर्यदासः पतत्यधः ॥१५॥ शास्त्रसमन्वयः

याप्रमाणे विशेषांचा परित्याग करून सामान्याकडे दृष्टी ठेवली असता समन्वय होतो. या **समन्वयाचे लक्षण** महाराजांनी एका पत्रात केले आहे -

एकाधिकरणक-भिन्नवृत्तित्वे सति,
संप्रदायविच्छेद-रहितत्वे सति, च
पूर्वानेक-फलोपष्टंभ-अनंतरम्
एकफलजनकत्वम्-समन्वयलक्षणम् ॥

१) सर्व संप्रदायांचे अधिकरण एक ब्रह्मच आहे. सर्वांचे प्राप्तव्य देखील ब्रह्मस्थितीच आहे. म्हणजे आधार आणि प्राप्तव्य एकच आहे. पण त्यांच्या वृत्ती मात्र

वेगवेगळ्या आहेत. जसा समुद्र एकच असून त्यावरील लाटा भिन्न भिन्न असतात. पण कोणत्याही लाटेत बुडी मारली तरी स्नान एकाच समुद्रात होते त्याप्रमाणे कोणत्याही संप्रदायाचा आधार घेतला तरी शेवटी ब्रह्मप्राप्तीच होते. लाटा एकाच समुद्रावर उत्पन्न होतात व त्यातच लय पावतात. त्याप्रमाणे सर्व संप्रदाय ब्रह्मावरच उदय पावतात व जीवाला ब्रह्मप्तीच करून देतात.

२) भिन्न भिन्न संप्रदायांचा समन्वय केला तरी ते संप्रदाय परंपरेपासूनविच्छेद पावत नाहीत किंवा नष्ट होत नाही. ते कायमच राहतात.

३) सर्व संप्रदाय, त्या त्या संप्रदायानुरूप फळांकडे जीवांना प्रवृत्त करून शेवटी ''अन्ततो गत्वा'' परब्रह्मप्राप्तीरूपी एकच फळ प्राप्त करून देतात; असे दाखविणे म्हणजे समन्वय होय.(यष्टि ७.पत्र- २२ पृ.१४८)

वाचस्पति मिश्रांनी देखील सांख्यतत्त्व कौमुदीत **''भिन्नांनां समानरूपता समन्वयः''** कारिका १६. अशी व्याख्या केली आहे.

वैदिक संप्रदायांचा समन्वय

समन्वयाची व्याख्या आणि अर्थ आपण वर पाहिला. असा हा समन्वय मागे सांगितल्याप्रमाणे ''उपजीव्य व उपजीवकरूप उत्तम समन्वय'' आहे. यानुसार महाराजांनी संप्रदायकुसुममधु या लहानशा पद्य ग्रंथात कोणत्या संप्रदायापासून कोणती भावना त्यांनी घेतली आहे आणि कसा समन्वय केला आहे हे दाखवून दिले आहे. पण यातील सर्व संप्रदाय वैदिक असून भक्तीला पोषक असलेल्या त्यांच्या भावनांचे महाराजांनी ग्रहण केले आहे. परंतु मुसलमान, ख्रिश्चन या धर्मात मुख्यतः व्यावहारिक तत्त्वेच अधिक आढळून येतात म्हणून त्यातील भावना ज्ञानोत्तर भक्तीच्या क्षेत्रात अगदीच गैरलागू असून अगदीच वेगळ्या पातळीवरच्या आहेत. त्यामुळे महाराजांना त्यांच्या भावनांचा समन्वय करण्याची गरज वाटली नसावी.

महाराज म्हणतात- ''ईश्वरभक्तांचा द्वेष करणे हानिकारक आहे. म्हणून सर्व संप्रदायांमधून मधुबिंदूचे सेवन करावे. संप्रदाय म्हणजे वेदानुसार, पुराणानुसार किंवा तंत्रमार्गानुसार जी सगुणोपास्ती श्रीगुरु सांगतात तो संप्रदाय होय. अशा या सर्व संप्रदायातून भक्तिप्रेमाला पोषक असलेल्या उत्तम भावना मी ग्रहण केल्या आहेत''

त्या खालीलप्रमाणे-

१. नारद पंचरात्र - वासुदेवाचा विग्रह हाच परम ब्रह्म असून अनेक साधनांनी त्यांची प्राप्ती करून घ्यावी. अशी नारदपंचरात्र या संप्रदायातील भावना संग्राह्य आहे.

२. पाशुपत - पशू म्हणजे जीव, त्यांचा पाश म्हणजे कर्मबंध. या कर्मबंधापासून निर्मुक्त असलेला, नित्य असलेला व मंत्रमय असलेला भगवान् शिव उपास्य आहे ही भावना पाशुपतांपासून घ्यावी.

३. शैव - सच्चिदानंदविग्रह आणि उमेसहित असलेल्या पंचवदन शिवाची नेहमी उपासना करावी, असे शैवसंप्रदायापासून घ्यावे.

४. शाक्त - सर्व स्त्रिया उमारूप असून त्यांचे ठिकाणी मातृभावना करावी, हे दक्षिणपंथी शाक्तांपासून घ्यावे.

५. पूर्णप्रज्ञ - भगवान विष्णू स्वतंत्र असून आणि बाकीचे सर्व त्यांच्या तंत्राने चालणारे (म्हणजे तंत्रक) आहेत ही भावना पूर्णप्रज्ञाचार्यांच्या संप्रदायापासून घ्यावी.

६. रामानुज - विभव-रूप, व्यूह-रूप, सूक्ष्म-रूप व अन्तरात असलेल्या अशा श्रीहरीचे श्रौत, स्मार्त कर्मानुष्ठानसहित पंचविध अर्चन करून जीव परमेश्वर स्वरूपाला प्राप्त होतो

अशी भावना रामानुजांपासून घ्यावी.

७. निम्बार्क - भगवंताला नैवेद्य दाखविणे, भगवत्प्रीत्यर्थ दान करणे किंवा ज्या योगे भक्त तृप्त होतील असे करणे व भगवान व भक्त एकरूपच आहेत, अशी निम्बार्कांची भावना घ्यावी.

८. राधिकावल्लभ - श्रीकृष्णाच्या चरणांची प्राप्ती करून घेण्यासाठी गोपीश्रेष्ठ राधेची सेवा करावी.

९. चैतन्य - रासेश्वर भगवान् कृष्ण वृंदावनात नित्य असतो आणि तो माधुर्यभक्तीनेच प्राप्त होण्यासारखा आहे, ही चैतन्य संप्रदायाची भावना महाराजांनी स्वीकारली आहे.

१०. वल्लभ - बालस्वरूप श्रीकृष्णाची वात्सल्य प्रेमाने पण मर्यादा राखून सेवा करावी, असे वल्लभ संप्रदायातून शिकावे.

११. गाणपत्य - गणेश हा विघ्नहर्ता असल्यामुळे, नेहमी चिंता सोडून भगवद्प्रेमात मग्न रहावे, हे गाणपत्य संप्रदायातून शिकावे.

१२. सौरागम - आदित्यात असलेला पुरुष तोच मी आहे असे समजावे. अशी सौरागमातील उपासना घ्यावी.

१३. प्रत्यभिज्ञा - शिव अद्वैतस्वरूप आहे. सर्वांच्या हृदयात

स्फूर्तिरूपाने तोच आहे म्हणून सुलभही आहे व तोच सर्वकर्ता आहे असे प्रत्यभिज्ञामतातील विवेचन पूर्ण स्वीकार्य आहे.

१४. रामानंद - अद्वैत अशा निर्गुण ब्रह्माचे ध्यान करावे आणि प्रमादरहित अशा सद्गुरूंची सेवा करावी, हे रामानंदांच्या संप्रदायातून शिकावे.

१५. विठ्ठल - भगवान् श्रीकृष्ण स्वधामाला गेले नाहीत. ते भीमातीरी पंढरपुरात आपल्या भक्तांसाठी येऊन राहिले आहेत, असे विठ्ठलसंप्रदायातून ग्रहण करावे.

१६. शांकर - ब्रह्म हे एकच आहे. पण भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी अनेक रूपे धारण करते. त्यापैकी कोणत्याही एकाचे भजन करावे त्या रूपाशी भक्तीने ऐक्य झाले की मुक्ती मिळते हे शांकर तत्त्वज्ञानातून घेतले आहे.

१७. मधुराद्वैत - ज्ञानाने अविद्येचा नाश झाल्यानंतर अनध्यस्त विवर्त असलेल्या साकार श्रीहरीचे नित्य भजन करावे. हेच आमचे सर्वाधिक मधुर असलेले मधु आहे असे महाराज म्हणतात.

अनध्यस्तविवर्तं हि साकारं श्रीहरिं भजेत् ।
ज्ञानाद् अविद्यानाशेऽपीत्यऽस्माकं मधुरं मधु ॥२०॥

याप्रमाणे सर्व वैदिक संप्रदायरूप कुसुमांतील मधुबिंदू गोळा करून महाराजांनी रासक्रीडेतील श्रीकृष्णप्रेमाला निरनिराळ्या मधुर उन्मेष आणलेले आहेत. असा समन्वयाचा प्रयत्न आजपर्यंत कोणीही स्पष्ट रूपाने केलेला नव्हता, त्यामुळे हे महाराजांचे संप्रदाय-समन्वयाचे वैशिष्ट्य आहे असे म्हणावे लागते.

०००

हिंदूधर्म व इतर धर्म

हिंदूधर्माची महाराजांनी इतर धर्माशी तुलना केली आहे. ती फार मार्मिक आहे. पण त्या आधी त्यांनी केलेली हिंदूची व्याख्या समजून घ्यावी लागेल.

हिंदू कोणास म्हणावे?

१. दीक्षाहिंदू २. जन्महिंदू ३. उभयार्य

१. वेद, वेदांगे, पुराणे व तदनकूल संप्रदाय हे ज्यास मान्य आहेत व जो परंपरागत हिंदूच्याच पोटी आला आहे त्यास.

२. परंतु हे ज्याला मनापासून प्रमाण वाटतात त्यालाही दीक्षाहिंदू किंवा दीक्षार्य म्हणावे.

३. ज्याला हे मान्य नाहीत व केवळ हिंदूच्याच पोटी आला आहे, तो जन्मार्य म्हणजे जन्महिंदू होय.

४. उभयार्य सर्वथा श्रेष्ठ आहे; पण -

५. पूज्यतेच्या दृष्टीने दीक्षार्यच मी श्रेष्ठ मानतो.

असे तीन प्रकार व त्यांची योजना महाराजांनी सांगितली आहे. या व्याख्येनुसार पाहिले असता वेद, वेदांगे व पुराणे हे सकृत्दर्शनी जैन व बुद्ध यांना मान्य नाहीत असे वाटते. पण पुनर्जन्म सिद्धान्त, अहिंसा वगैरे पाहिली असता हे संप्रदाय अहिंसा या योगतत्त्वावर आधारलेलेआर्य धर्माचीच वेगळी रूपे आहेत असे स्पष्ट दिसते. वेद-पुराणांशी जैन व बौद्धांचा विरोध असला तरी त्यातीलच तत्त्वे जैन व बौद्धांनी ग्रहण केली आहेत. भगवान् ऋषभदेव यांचा शिष्य आर्हत् राजा होता. ऋषभदेवांचे वर्णन व स्तुती भागवत पुराणातून आले आहे म्हणून यात पुराणानुगमन असल्याने जैन धर्माला हिंदुधर्माच्याच एका अंशावर विस्तारलेला संप्रदाय म्हणणे योग्य ठरेल.

त्याचप्रमाणे भगवान् बुद्धाला वैदिक धर्मात अवतार म्हटलेले आहे. मेरुतंत्रात ''स्वधर्म सुटलेल्या ब्राह्मण व क्षत्रियांनी षोडशोपचारांनी भगवान् विष्णूच्या बुद्धावताराची उपासना करावी'' असेही सांगितले आहे.

या बौद्ध पंथातील अहिंसा व सत्य ही वैदिक तत्त्वेच आहेत त्यामुळे बौद्ध व जैन ही दोन्ही मते हिंदूंधर्माचाच एक भाग आहेत. पण बौद्ध संप्रदायाने भारताच्या दिशा ओलांडून चीन-जपानार्यंत मजल मारली व त्यामुळेबुद्धानुयायांच्या बहुसंख्येमुळे याला हिंदुधर्मापासून भिन्न धर्म म्हणून जगात मान्यता मिळाली. पण वस्तुतः मूळ हिंदुधर्माशी याचा विरोध नाही याचा हिंदुधर्माशी सहज समन्वय होतो.

वैदिकेतर धर्म : ऋषींकडून स्थापना

वेदमार्गापासून जे जबरदस्तीने च्युत झाले आहेत त्यांना कर्मफल भोगल्यानंतर जन्ममार्गाने वेदमार्गात येण्याकरता ऋषींच्या द्वारा परमेश्वरानेच वैदिकेतर धर्मांची स्थापना केली आहे. महाभारतातील शांतिपर्वान्तर्गत मोक्षधर्मात असा इतिहास आहे. की, सृष्टीच्या पूर्वी त्यांना नारायणापासून **'अपांतरतम' नावाचे वेदाचार्य ऋषी** उत्पन्न झाले. त्यांना नारायणाने वर दिला की,

''तूं अनंत कल्पपर्यंत माझे गुणानुवाद गात राहशील. तुला सगळे समजेल तूं पराशरांच्या पोटी व्यास म्हणून अवतार घेशील. वेदान्तासूत्रे करशील.'' पुढे आणखी असा वर होता की-

'कलि प्राप्त होईल तेव्हा तुझे काळे रूप होईल

व त्यावेळी तूं नाना देशात नाना कर्मांचा प्रवर्तक होशील. तूं नाना देशात नाना कर्मे करशील व त्या त्या सर्व कर्मांनी तूं लोकांना तारण्याच यत्न करशील''

याप्रमाणे अपांतरतम ऋषी हेच सत्यवतीसुत व्यास झाले व तेच कलीत नाना कर्मांचे व ज्ञानांचे प्रवर्तक होत असतात. जगातील सर्व लोकांना पतितावस्थेतून तारण्यासाठी भगवान् व्यासच नाना अवतार घेत असल्यामुळे, त्या त्या सर्व ज्ञानांचा आणि कर्मांचा खरोखरीचा विरोध असणे शक्यच नाही. त्यांचा समन्वयच केला गेला पाहिजे.

जगातील सर्व वेदकबाह्य लोकांना त्यांच्या त्यांच्या धर्मस्थापकांच्या रूपाने परमेश्वरानेच आश्वासन दिलेले आहे. म्हणून त्यांना पुढे या लोकात किंवा पुढील जन्मी मूळ वैदिक धर्म मिळतो; असे महाराज म्हणतात.

एवढा आग्रह हा कदाचित् हिंदु-धर्माचा गौणपणा वाटत असला तरी 'वैदिक धर्मियांना या लोकात किंवा परलोकात आमचा धर्म मिळतो' असे इतर धर्मवादी म्हणत नाहीत. उलट 'आताच वैदिक धर्माचा त्याग करून आमचा धर्म स्वीकारला पाहिजे तरच त्यांची सद्गती

होईल' असे ते म्हणतात. म्हणून वैदिक धर्मियांची ही धर्मभेदसहिष्णुता सत्याच्याच आधाराने आली आहे, हे निःसंशय !

आर्यांनी तात्त्विक वाद करूनच धर्मोपदेश केला आहे. ज्यांना रुचेल त्यांनी आर्यधर्मातील भक्तीचा व तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला आहे. वैयक्तिक निंदेने किंवा लढाई करून धर्म स्थापण्याची आर्यांना कालत्रयी संवय नाही. म्हणूनच मुसलमान वगैरे इतर-धर्मीय लोकांनी आर्यधर्माशी ऐक्य करून घेतलेअसा इतिहास सापडतो. उदा. -

* बौद्धधर्मातील'महायान' पंथांचे शैव पंथाशी ऐक्य,
* महम्मदी धर्मातून 'दिन इलाही' सारखे पंथ,
* जैनधर्मातून 'समयसारा'सारखे ग्रंथ,
* ख्रिश्चन धर्मातून 'थियॉसफी' सारखे पंथ.

हे सर्वप्रकार आर्यांच्या धर्मभेद सहिष्णुतेमुळेच उत्पन्न झालेले आहेत.

धर्मसमन्वय व धर्मसंकर

समन्वय हा स्वधर्माच्याच तत्त्वांनी करावयाचा असतो. आणि समन्वय केल्यानंतर देखील प्रत्येकजण आपापल्या स्वधर्माचे पालन करण्यास स्वतंत्र राहतो.

त्याला स्वधर्मात उणेपणा दिसत नाही किंवा दुसरीकडून तत्त्वे घेण्याचीही आवश्यकता राहत नाही. याला समन्वय म्हणतात.

याहून इतर सर्व प्रकार धर्म घोटाळ्याचे म्हणजे धर्मसंकराचे आहेत. याचे उदाहरण म्हणून ॲनी बेझंटच्या थियॉसफीचा उल्लेख महाराजांनी केला आहे. ते म्हणतात- ''थिऑसफीच्या लोकांनीसमन्वयाच्या नावाखाली धर्मसंकर केला आहे. त्यांचे म्हणणे आहे की ते हिंदूंच्या ज्ञानात निष्णात आहेत. त्यांनी सप्तलोक स्वीकारले आहेत. पण ते ना बुद्धांचे ना हिंदूंचे ! त्यांनी निर्वाण, परनिर्वाण हे बौद्ध धर्मातील शब्द घेऊन त्यांचा परलोकपर अर्थ केला आहे. त्यामुळे ना आर्यधर्म, ना बुद्धधर्म, ना त्यांचा स्वतःचा ख्रिश्चन धर्म, असा धर्मसंकर झाला आहे. असे करणारे **धर्मगारूडी** होत. हे एका धर्मातील शब्दाने दुसऱ्या धर्मियांचे मन मोहित करतात व आपली छाप बसवितात. बुद्धधर्मातील शब्दांचा विपर्यास आर्यधर्मीयांना व आर्यधर्मातील शब्दांचा विपर्यास बौद्धांना सांगणारे ॲनी बेझंट सारखे लोक असतात.

''स यत् प्रमाणं कुरुते'' या गीतावचनावरून सय्यद शब्द गीतेत आहे असे म्हणण्यासारखा यांचा उपदेश असतो''. असे महाराज साधुबोधात स्पष्ट शब्दात मांडतात.

हिंदूधर्माचे पुरातनत्व

जीवप्रणीत धर्म - ज्या धर्मात ज्ञान म्हणजे व्यावहारिक गोष्टी अधिक आहेत व अदृष्ट कल्पना कमी आहेत तो धर्म जीवप्रणीत म्हटला जातो. पण त्यातही सेश्वरतंत्रता असेल तर मात्र त्यापासून अधोगती न होता त्यावर दृढ निष्ठा असेल तर उन्नतीच होते. म्हणून जीवप्रणीतत्व असूनही त्या सर्वांना धर्मत्व आहे.

* आर्यधर्मात अदृष्ट कल्पना जास्त आहेत,
* तत्त्वज्ञान जास्त आहे आणि -
* ऐतिहासिक दृष्टीनेही सर्व धर्म उत्पन्न होण्यापूर्वी तीन हजार वर्षापूर्वी आर्य धर्मच सर्व जगात पसरला होता असा इतिहासावरूनही शोध लागतो. म्हणून आर्य धर्मच सर्वात पुरातन आहे असे स्पष्टच दिसून येते. असा हा पुरातन धर्म अजून टिकला कसा, याचे आश्चर्य लोकांना वाटते पण त्याचे मार्मिक उत्तर महाराजांनी दिले आहे.

हिंदुधर्म कां राहिला ?

मुसलमान व ख्रिश्चनधर्मांनी देशच्या देश बाटविले असताही आर्यधर्म टिकला, याचे कारण सांगताना महाराज साधुबोधात म्हणतात-

१) हे सर्व धर्म आपल्या आर्यधर्माचीच अधिकारानुसार स्वरूपे आहेत हे आर्यांना ठाऊक आहे.

२) इतर धर्मांत जे नाही ते आर्यधर्मात आहे.

३) इतर धर्मात जे आहे तेही आर्यधर्मात आहे.

४) आर्यधर्मात नाही ते इतर कोठेच नाही. आर्यांच्या सहवासामुळे इतर धर्मीयांनाही हे कळू लागले आहे.

५) इतर धर्मीयांनी जरी आर्य धर्म मोडण्याची खटपट केली तरी आर्यधर्माने मात्र इतर धर्म मोडण्याची खटपट केली नाही.

अशा आर्यांच्या धर्मभेदसहिष्णुतेमुळे आर्यांचा नायनाट करणे विचारी पुरुषांना बरे वाटले नाही. आणि जे जे परकीय धर्म हिंदुस्थानात आले त्यातील काही विचारी पुरुषांनी आर्यधर्माशी ऐक्य करून घेण्याचाच प्रयत्न केला. पार्शी, मुसलमान व ख्रिश्चनासंबंधी आपण वर पाहिलेच आहे. तथापि ही खटपट हिंदूंनी केली नसून

(४१)

परकीयांनीच हिंदुधर्माला भाळून आपले ऐक्य करून घेतले असा इतिहास सापडतो. पुढे महाराज आत्मविश्वासाने म्हणतात-

'दुसरीकडे कितीही जड सुधारणा झाली तरी तिचा जेव्हा कंटाळा येईल तेव्हा सर्वांना शांती आर्यावर्तातच मिळेल व याचमुळे आर्यदेश टिकला आहे व टिकणार आहे.'

<u>ख्रिश्चनधर्म</u>

विकटान्वयसंभूता गुरुण्डा वानराननाः ।
वाणिज्यार्थमिहायाता गौरुण्डा बौद्ध-पन्थिनः ॥७२॥
ईशपुत्रमते संस्था तेषां हृदयमुत्तमम् ॥७३॥

बौद्ध धर्मातून ईशपुत्रधर्म निघाला हे आता पाश्चात्य लोकही मान्य करू लागले आहेत. बौद्ध जातक आणि बायबलाचा मेळ पडतो असेही तद्धर्मीच म्हणूं लागले आहेत. याच ठिकाणी असा इतिहास आहे की एकदा सृष्टीत प्रलय झाला व न्यूहाला - नोहाला देवाने नावेत बसविले व वाचविले हा नोहा ध्यान कसे करीत होता तर-

न्यूहः स्मृतो विष्णुभक्तः सोहंध्यानपरायणः।
एकदा भगवान् विष्णुस्तत्स्वप्ने तु समागतः॥४७॥

या श्लोकात नोहाची सगुणोपासना व

(४२)

निर्गुणोपासना दोन्ही व्यक्त झाल्या आहेत. याप्रमाणे महाराजांनी या धर्माचे भागवत धर्माशी साम्य दाखविले आहे. पण सध्याचे ईशपुत्रमत यावनीमताशी म्हणजे मुसलमान मताशी मिश्रित झाले आहे.

ईशपुत्र धर्मांतील लोकांनी जर भविष्यपुराणातील न्यूहराजा पाळत असलेलाआचार पाळला तर त्यांची उत्तम गती होईल.

विष्णुभक्ती, अग्निपूजा, अहिंसा, तप, यम, दम यांचे पालन केले तर ते भागवत धर्मात सहज येऊन परमेश्वरप्राप्ती करून घेऊ शकतात, असे स्पष्ट मत मांडले आहे. 'य१७-समयोपदेशा'तही महाराजांनी ख्रिश्चन धर्मासंबंधी सविस्तर विवेचन केले आहे. येशूख्रिस्ताला ध्यानावस्थेतील एकाग्रतेत परमेश्वराने धर्म सांगितला असे म्हटले आहे. ही ध्यानावस्था म्हणजे आपल्या धर्मातील साक्षात्कारावस्थाच होय. यामुळेच येशूने ईश्वराला पिता म्हटले व ईश्वरापासून ज्ञान घेऊन त्याचा प्रसार केला. ईश्वराला पिता समजणे ही लालनभक्ती मूळची आर्यधर्मातीलच आहे.

(४३)

<u>समान तत्त्वे</u>

आपण सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानातील महत्वाच्या गोष्टी पाहिल्या तर असे लक्षात येईल की सर्वांत काही समान तत्त्वे आहेत.

१) पूज्यबुद्धि व भीती.
२) ईश्वराशी प्रेमपूर्वक नाते जुळविणे.
३) ईश्वर व आपण एक होणे.

* यापैकी 'भीती' आणि पूज्यबुद्धी मुसलमान धर्मात आहे.
* ईश्वराशी पिता म्हणून येशूने नाते जुळविले आहे.
* हिंदूंच्या अद्वैतात जीवेशांचे ऐक्य हेच मुळी ध्येय आहे.

<u>इतर धर्मातील अतिरेक</u>

ख्रिश्चन धर्मात अशी कल्पना आहे की, ख्रिस्त हा अनीतिमान ख्रिश्चनांनासुद्धा उद्धरून नेईल पण नीतिमान् असलेल्या इतर धर्मीयांना नरकांत टाकील. अशी कल्पना हिंदूधर्मात मुळीच नाही.

'कोणत्याही धर्मातील चांगल्या सद्गुणी मनुष्याचा उद्धारच होतो व वाईटांचा नाश होतो' असे आर्यधर्मात मानले आहे. उदा. देव व दैत्यांचा लढा नेहमीच चालला असतो पण असुरकुलातील प्रल्हादाचे रक्षण ईश्वरानेच केले, असा आर्यधर्मातील इतिहास आहे.

(४४)

बिभीषण दैत्यवंशीय असून रामाने रावणाचा वध केल्यानंतर त्यालाच परत राज्य दिले. स्वतःच्या घशात टाकले नाही. आपल्याकडे राज्य घशात टाकण्याची चाल नाही. उलट चांगले राज्य ठेवून वाईट राज्य नाहीसे करावे असे आहे.

''आर्य धर्मातील राष्ट्र कल्पना जगातील सर्व देशांपेक्षा वरचढ आहे हे म्हणणे अभिमानाचे नाही तर निःपक्षपातीपणाचे आहे.''

आपल्याकडे जित देशातील चांगल्या व्यक्तीला 'होमरूल' देण्याची पद्धत होती तर पाश्चात्यांची शत्रूला होकुंडात घालण्याची पद्धत होती आणि अजूनही आहे.

ख्रिश्चन धर्मात बायबलमध्ये विखुरलेले टीचींगस् आहेत. पाद्री लोकांनीन्यू टेस्टामेंटमध्ये थिऑलाजी घालून त्यांना व्यवस्थित केले आहे. ईश्वर घेतला आहे व ईश्वरकल्पनेपलीकडे कोणतीच कल्पना जाऊ शकत नाही, असे लिहिले आहे. ख्रिस्तावरच विश्वास ठेवण्यास सांगितले आहे. तो दयाळू असून फक्त ख्रिस्ती लोकांनाच सुखी ठेवतो इतरांना नरकात टाकतो असे म्हटले आहे. स्वर्ग व नरक हे दोनच भाग केले आहेत. कारण-

(४५)

बटलर सेरमनने 'ॲनॉलाजी ऑफ थिऑलाजी' या आपल्या ग्रंथात चांगल्या गुणांचा पुतळा ईश्वर व वाईट गुणांचा पुतळा सैतान आहे. असे म्हटले आहे पण त्यात फिलॉसाफीचा समावेश केला नाही. यांच्यात -

१) नीतीचे नियम निराळे २) राष्ट्राचे कायदे निराळे ३) धार्मिक तऱ्हा निराळी ४) फिलासाफीची बडबड निराळी.

असा प्रत्येक गोष्टीत निराळेपणा असल्यामुळे नीतीकरता नीतीमान राहून दुसऱ्या देशाचा उद्धार करावा असे विचार आढळत नाहीत. आपलाच स्वार्थ साधून तुबंडी भरण्याची हाव दिसून येते. उलट आपल्याकडे मात्र -

१) नीतीला धर्माची मर्यादा आहे.
२) धर्माने समाज नियंत्रित आहे.
३) राष्ट्र समाजाचे बनलेले आहे.
४) धर्म फिलासाफीने बांधलेला असून-
५) फिलॉसॉफी ऑकल्टीझमने/ गूढवादाने बांधलेली आहे.

-असे पाश्चात्य धर्मात नसल्यामुळे साक्रेटिस सारख्या महान तत्त्वज्ञान्याला प्राणास मुकावे लागले. असे भयंकर प्रकार पाश्चात्यांच्या धार्मिक इतिहासात

(४६)

आढळतात. त्यामुळे या लोकांना तत्त्वज्ञानासाठी इतरांच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग आला. आणि मुख्य म्हणजे धर्मात फिलॉसफीचा समावेश न झाल्यामुळे धर्माचा टिकाऊपणा नाहीसा झाला.

आपल्या हिंदू धर्मावर पुष्कळदा धाड आली पण त्यात फिलॉसाफीचा समावेश असल्यामुळे तो बुडाला नाही व पुढे कधी बुडणेही शक्य नाही. जरी एखादे वेळेस दुसऱ्या धर्मातील विचार आपल्या धर्मात घुसडल्या गेले तरी थोडी स्वतंत्रता आल्याबरोबर पुनः खरा धर्म स्थापला जातो व त्यात फिलॉसफी असल्यामुळे हिंदुधर्मावर दुसऱ्या धर्माचे परिणाम जास्त काळ राहू शकत नाहीत.

महाराजांनी ख्रिश्चन धर्माची आर्यधर्माशी तुलना करून आर्यधर्माचे सर्वांगपूर्णत्व दाखविले आहे. पूज्यबुद्धी, ईश्वराची भीती आणि ईश्वराशी नाते जुळविणे; येथपर्यंतच ख्रिश्चन धर्माची मजल जाते व त्यापलीकडे ईश्वराशी ऐक्य करणे आपल्या हिंदुधर्मातच असल्यामुळे हिंदुधर्म ही ख्रिस्ती धर्माच्या वरची पायरी आहे हे सहज दिसून येते.

याप्रमाणे समन्वय करून पुढें महाराजांनी ''आपला स्वधर्म, मग तो कोणताही असो, आत्यंतिक

(४७)

निष्ठेने जर पाळला तर पुढील जन्मी क्रममार्गाने किंवा याच जन्मी भक्तिमार्गाने आर्यांचे तत्त्वज्ञान शिकून पूर्णत्व येऊ शकते'' अशी व्यवस्था असल्याचे दाखवून दिले आहे.

येशू ख्रिस्ताने हिंदुस्थानातूनच योग शिकून अध्यात्मज्ञानाचे भांडारातून काही अंश, पाश्चात्य जगाचा उद्धार करण्यासाठी नेले. त्यामुळे हा ख्रिस्तीधर्म आर्य ऋषींनीच प्रवर्तित केलेला धर्म आहे, असे म्हणावयास काही हरकत नाही. त्यामुळे तत्त्वदृष्ट्या त्यांना आपला मूळ धर्म शिकविण्यासही काही प्रत्यवाय नाही अशी उपपत्ती महाराजांच्या विचार गंगेतून सहज निघते.

<u>इस्लाम</u>

मुसलमान धर्मापूर्वी आर्यधर्मच पश्चिम आशियात होता, हे ऐतिहासिक पुराव्यांवरून सर्वांना माहितच आहे. परमेश्वरानेच अपांतरतम ऋषींच्या द्वारा सर्व धर्म उत्पन्न केले असल्याने महाराजांनीही मूळ दृष्टीने समन्वय करून दिला आहे. पण मुसलमानांनी भारतात आल्यापासून सतत हिंदूंवर अत्याचार केले आहेत म्हणून महाराजांनी दाखविलेल्या समन्वयाचा आज जरी उपयोग दिसत नसला तरी भविष्यकाळात उपयोग होईलच.

(४८)

संप्रदायसुरतरू (अ.२०), सुबोधहिंदुधर्म, साधुबोध आणि १२ व्या यष्टीतील एक लेख, वगैरे ठिकाणी महाराजांनी मुसलमान धर्मासंबंधी आपले विचार मांडले आहेत. मुसलमानांच्या धर्म व अधर्माच्या कल्पना श्रुतिस्मृति-विरहित आहेत. श्रुतीत ज्याला अधर्म म्हटले आहे त्यालाच हे अधर्म म्हणतील असा नियम नाही. यांचा आचार भविष्यपुराणात सांगितला आहे. महाराजांनी भविष्यपुराण हे व्यासप्रणीतच मानले आहे व त्यासंबंधी प्रक्षिप्त वादाचे अनेकशः खंडनही केले आहे. त्यामुळे त्यांनी त्यातील वचने पूर्णपणे प्रमाण मानून मुसलमान धर्माचा समन्वय केलेला आढळतो.

यवनमताचा व आर्यमताचा समन्वय करण्याचा प्रयत्न पंजाबात गुरुनानकांनी, उत्तर प्रदेशात कबिरांनी व महाराष्ट्रात शेखमहंमद वगैरे अनेक सत्पुरुषांनी केला. शेखमहंमद योगसंग्राम प्रसंग १८ मध्ये सांगतात-

रामरहिमा करिमा केशव अलख नाम सब एक हि है ।।
जिसको तुम बिसमिल्ला कहते वोहि विष्णु हमारा है
।।कबीर।।

हवकला इलाहा इल्लल्ला । हजरत महम्मद रसुल्लल्ला । या

(४९)

दोहो चरणात पाहिजे ओळखिला । ईश्वर विश्वरूपे ।।६६।। लाईल्ला याची टीका अवधारा । नामरूपा वेगळा ईश्वर स्मरा । तेणे शीघ्र भवनदीचा फेरा । चुकेल बापा ।।६७।। मुसलमान कहे जिकिर बुखानंद । मऱ्हाठे म्हणती कथेचा आनंद । परि दोही भाषांचा भेद । ईश्वर अल्ला जाणे ।।६८।। ईश्वर म्हणजे विश्वंभर । दगडाचा नोहे ओळखा जाहिर । त्या पासून असंख्य अवतार । रामकृष्ण जन्मले ।।६९।। अल्ला म्हणजे अलिफ न्यारा । बाहनही निशिदिनी अवधारा । एकला एक जीवका प्यारा । **गुफर रहिम** ।।७०।।

याप्रमाणे अनेक मुसलमानांनी रामकृष्णादिकांची भक्ती करून हिंदुधर्मातील मोक्ष भक्ती आणि तत्त्वज्ञान मिळविले आहे. सर्व हिंदु संतांनीही त्यांना वेळप्रसंगी उपदेश दिला आहे. अशा मुसलमान भक्तांनी हिंदु-मुसलमान हा झगडा मिटविण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने एकूण मुसलमान समाज हा अशिक्षित असल्याने त्यांच्यावर काजी मुल्लांची पकड असाधारण आहे म्हणून या संतांचा प्रभाव मुसलमान समाजावर पडला नाही.

दुसरे असे की राजकीय दृष्टीने पूर्वी इंग्रजांनी मुसलमानांना, संरक्षणाच्या नावाखाली अनेक सवलती

(५०)

दिल्या आणि आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही भारत सरकार अल्पसंख्य समाज म्हणून त्यांचा अनुनय करीत आहे. त्यामुळे हिंदुधर्माशी फटकून वागणे हेच त्यांच्या स्वार्थ दृष्टीने हिताचे आहे. म्हणूनजोपर्यंत ही राजकीय परिस्थिति हिंदु मुसलमानांसाठी सारखी हो नाही तोंपर्यंत मुसलमानांचा हिंदुधर्माशी सांस्कृतिक समन्वय होऊन भारतीय समाजांचे सामरस्य होणे दुर्घट आहे.

विचार एक पण आचार भिन्न

या मुसलमान संतांनी जसा हिंदुधर्माचा द्वेष केला नाही तसा हिंदूनीही मुसलमानांचा कधी द्वेष केला नाही. जे भक्तिपंथात आले त्यांना सर्व तत्त्वज्ञान व भक्तीचा उपदेश हिंदू संतांनी केला, मात्र आचार धर्माचा आग्रह केला नाही. हेच हिंदुधर्माचे सर्वसमावेशकत्वाचे लक्षण आहे आणि याच कारणामुळे हिंदुधर्मातच अनेक संप्रदायांचे आचार भिन्न असूनही त्यांच्यात श्रेष्ठ महात्मे उत्पन्न झालेत.

प्रत्येक संप्रदायांची वैशिष्ट्ये कायम राखून त्यांचा मुख्य धर्माशी समन्वय केला म्हणजेच तो समन्वय टिकाऊ होत असतो. यासंबंधी एका पत्रात महाराजांनी मांडलेले विचार मननीय आहेत.

(५१)

महाराजांनी द्वेषाचे दोन प्रकार केले आहेत. धार्मिक आणि राजकीय. पैकी धार्मिक-तत्त्वज्ञानाच्या आधाराने हिंदु-मुसलमानात द्वेष कधीच राहू शकत नाही असे ते म्हणतात व त्यांनी अनेक उदाहरणे देऊन स्वार्थामुळे, राजकीय द्वेषामुळे व व्यावहारिक दुर्गुणांमुळे हिंदु-मुसलमानांच्या लढाया झाल्या असे दाखवून दिले आहे. मात्र ''मुसलमानात आपसात शिया व सुन्नी या दोन पंथांच्या लढाया केवळ धर्मद्वेषामुळे होत असतात.''

टॉडकृत राजस्थानच्या इतिहासात टॉडने म्हटले आहे की - ''मुसलमानांचा व हिंदूंचा धर्मद्वेष तरी निव्वळ धर्माभिमानाने उत्पन्न झालेला नसून हिंदूंना जीवापेक्षा पलिकडे वाटणारी जी बायकांची अब्रू ती घेतल्यामुळे झाला आहे.''

'परधर्मी मनुष्य नको' या द्वेषाने खरोखरच हिंदूंनी युद्ध केले नाही व पुढे होणारही नाही. पण परधर्मीयांनीही आमच्याप्रमाणे सहिष्णू व्हावे असे हिंदूंना वाटते. आम्ही त्यांच्या धर्मात ढवळाढवळ करीत नाही म्हणून त्यांनीही आमच्या धर्मात हात घालू नये, असे हिंदूंना वाटणेस्वाभाविक आहे.

(५२)

''हिंदूंच्या धर्मांत ढवळाढवळ केली तरी हिंदूंनी उगे राहावे, म्हणजे हिंदुत्व नाहीसे करावे की काय?'' असे महाराज रोखठोकपणे विचारतात.हिंदुधर्म हा मतभेदसहिष्णू असल्यामुळे हिंदूंनी नास्तिकांनाही जिवंत ठेवले तसेच हिंदुधर्मांतर्गत अनेक भिन्न भिन्न संप्रदाय नवीन उत्पन्न होऊन वाढू शकले आणि या प्रवृत्तिमुळे हिंदूंनी स्वतःहून कधीही धर्मासाठी म्हणजे - ''दुसरा धर्म नको'' या उद्देशाने कधी युद्ध केले नाही अशी इतिहासाची साक्ष आहे.

हिंदूनी युक्तिवादानेच आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. हिंदुधर्मातील बौद्धादि पंथांचा विस्तार तलवारीच्या बळावर झालेला नसून सुसंस्कारांच्या व उपदेशाच्या बळावर झालेला आहे, हे साऱ्या जगाने लक्षात घेतले पाहिजे.

साम्य स्थळे

महाराजांनी ५-३-१९१४ च्या लेखात हिंदु व मुसलमानांच्या धर्मतत्त्वांतील साम्यस्थळे दाखवून दिली आहेत ती पाहण्याजोगी आहेत.

१) हिंदूच्या धार्मिक इतिहासात देवासुर संग्रामाने ठाण दिले आहे तर मुसलमानांच्या धार्मिक इतिहासात

(५३)

शियासुन्नीतील लढ्याने कायमचे ठाणे दिले आहे. अजूनही त्यांच्यात झगडे चालूच आहेत.

२) हिंदुधर्मात -

* कर्मकांड, * उपासनाकांड, * ज्ञानकांड,
असे तीन विभाग आहेत.

मुसलमानातही -

* शर्यत, *तारिकत, *हकीकत, असे तीन विभाग आहेत.

३) हिंदु व मुसलमानांचा असा समज सारखाच आहे की कर्मकांड व ज्ञानकांड किंवा शर्यत व हकीकत या सर्व गोष्टी परमेश्वरापासूनच निघाल्या आहेत.

४) केवळ मृगचर्म घेऊन राहणारा हिंदू तापसी आणि लोकरीचे टोपरे घालून राहणारा सुफीपंथी संत हे शरीराने दोन असले तरी मनाने एकच आहेत.

५) ''मी वारंवार उत्पन्न होणाऱ्या गवताप्रमाणे ७७० वेळा जन्मलो'' असे **फारसी महाकवी जलालुद्दिन रूआ साहेब** यांनी आपल्या ''मस्नवी एक मानवी'' या ग्रंथात म्हटले आहे-

हफत् सद हफ्रात् कांलिफ दिदा अम् ।
मिस्ल सब्जा बार हारो हिदा अम् ।।

(५४)

असे त्यांचे शब्द आहेत. हिंदुधर्माचा पुनर्जन्माचा सिद्धांत यापेक्षा वेगळा तो कोणता?

६) परमेश्वराला विसरणे याचेच नांव संसार आहे. बायकामुलांचे नांव संसार नाही.-

''चिष्त दुनिया अस् खुदा गाफिल बुदन् ।
नैक माषेनुक्रवो फर्ज्नदजन् ।।

इत्यादी फारशी वचनाशी - 'अज्ञानापासून बंध होतो' या आर्याच्या कल्पनेशी सुफींच्या कल्पनेचे साम्य आहे.

७) ऋग्वेदातील कर्मकांडाला आर्यांनी मुंडकोपनिषदात अपराविद्या मानले आहे.

*तसेच पोथीपासून ज्ञान होणार नाही. असे एका फार्सी वचनात म्हटले आहे.

८) हिंदुधर्मात 'कनिष्टा प्रतिमापूजा' अशी वाक्ये आहेत.

* सुफी पंथातही मूर्तिपूजक म्हणजे एकनिष्ठ भक्त अशी आलंकारिक भाषा होऊन गेली होती. **शाम जज्जाली** साहेबाच्या पूर्वी मूर्तिपूजकांचा कोणत्यातरी दृष्टीने मुसलमान धर्मात समन्वय झालेलाच होता व हा सर्व प्रकार मुसलमान हिंदुस्थानात येण्यापूर्वीचा होता. म्हणूनच

(५५)

हिंदुमुसलमानांच्या द्वेषाला धार्मिक तत्त्वज्ञानानुसार असे कोणतेही कारण नाही.

९) **'अल्ला'** - या संस्कृत शब्दाचा अर्थ आई असा आहे. ईश्वर माता आहे अशा मातृभक्तीपरच तो अर्थ कुराणात जसाच्या तसा घेतला आहे.

१०) कोणी हिंदुधर्मातील अल्लोपनिषत् मुसलमान धर्माला मूळ आहे असे म्हणतात.

११) एका पंडिताचा एक श्लोक आहे-

अल्ला देवो, देवपूजा नमाजो ।
कल्पा मंत्रो तीस रोजे व्रतानि ।
काजी स्मार्तो पंडितस्तत्र मुल्ला ।
ख्वाजाचार्यो नैव शास्त्रप्रभेदः ।।

१२) कोणत्याही धर्मात न राहून वाटेल तसे वागणे हिंदुधर्माला संमत नाही. यासंबंधी एका कवीची कविता महाराजांनी उद्धृत केली आहे.

न संध्यां संधत्ते, नियमित नमाजो न कुरुते ।
न वा मौंजीबंधो, नच खलु कृतः सोन्नतविधिः ।।
न रोजान् जानीते, व्रतमपि हरेर्नैव कुरुते ।
न काशी वा मक्का, शिव शिव, न हिंदुर्न यवनः ।।

(५६)

१३) हिंदुधर्माप्रमाणे मुसलमान धर्मातही मंत्रशास्त्र असून त्यांचे फलही प्राप्त होते. हा नामाला आधार असलेल्या भगवंताच्या अधिष्ठानाचाच परिणाम आहे.

बिस्मिला हेर्रहेमानिर्रहीमअल्ला होरवी महम्मद रसूलव्वाजे कीतस्वोर कुला आलम हजूर भै जैगेमवक्कलल्या वेगे जरूर ।। मंत्रमहार्णव - मुसलमानी मंत्र ।।१।।

याप्रकारे मंत्रशास्त्र असून त्यांची फळेही सिद्ध होऊन मिळतात. (संप्रदायसुरतरू भा.१. अ.८) याप्रमाणे महाराजांनी बरीच साम्यस्थळे दाखवून दिली आहेत आणि पूर्वीच्या हिंदुमुसलमान संतांनी केलेला धर्मसमन्वय मान्य केला आहे.

तसेच मुसलमान धर्म उत्पन्न होण्यापूर्वी अरबस्थान अफगाणिस्थान वगैरे देशात आर्यधर्मच होता पण धार्मिक आचारक्रिया सुटल्यामुळे परमेश्वराने पतित लोकांना पुनः परमार्थ मार्गावर आणण्यासाठी मुसलमानी धर्म उत्पन्न केला असे इतिहासावरून आणि आपल्या पुराणांवरून अनुमान करता येत असल्यामुळे व्यापक अशा हिंदुधर्माशी या मुसलमान धर्माचा सहज समन्वय होतो.

येथे एक नवीन मुद्दा असा दिसतो की अनेक हिंदुसाधूंच्या समाधीचा मुसलमान लोक पीर म्हणून जबरदस्तीनेकब्जा घेतात व त्याची पूजा सुरू करतात.

याचा अर्थ त्यांच्या धर्मतत्त्वात इतर धर्मीय साधूंची पूजा करू नये असे मुळीच नाही. तसे असते तर त्यांनीड हिंदू साधूंची पीर म्हणून पूजा मुळीच केली नसती. परंतु मुसलमान लोक जुलूमे हिंदु-साधूची समाधी ताब्यात घेतात. हिंदू देवळे उध्वस्त करून त्यांना नमाजाची म्हणजे प्रार्थनेची स्थाने करतात. याचा अर्थ मुसलमान लोक हिंदू लोकांची व्यावहारिक स्वार्थ दृष्टीने आणि राजकीय दृष्टीने द्वेष करतात, धर्माच्या तात्त्विक दृष्टीने नव्हे! मूळ इस्लाम धर्मातील साधुपुरुषांचा द्वेष शिकविला असता तर हिंदू साधूची पीर म्हणून त्यांनी कधीच पूजा केली नसती. म्हणून महाराजांचे जे मत आहे की 'हिंदुमुसलमानाचां द्वेष धर्म(तत्त्व)मूलक नसून राजकीय आहे': आणि हेच योग्य दिसते.

<u>जैन दर्शन</u>

जैनाला धर्म म्हणण्यापेक्षा पंथ म्हणणेच योग्य आहे. महाराजांनीही जैन मताचे जे खंडन केले आहे ते तत्त्वज्ञान दृष्टीने केले आहे आणि त्यांनी वेद न मानल्यामुळे

त्यांना अवैदिक ठरविले आहे. पण त्यातील अहिंसा, पुनर्जन्म, वर्णाश्रम धर्म, मुक्ती वगैरेंचे वैदिक धर्माशी इतके साम्य आहे की याला परधर्म म्हणणे योग्य नाही. **नास्तिक जर हिंदू राहू शकतो तर जैनाला हिंदू म्हणण्यात काहीच प्रत्यवाय नाही.** पण आजकाल राजकीय स्वार्थ दृष्टीने जैन लोक देखील आपला धर्म पूर्वी प्रमाणे हिंदू न लिहिता 'जैन' म्हणून लिहीत आहेत. हे मात्र अत्यंत दुर्दैव आहे.

हिंदुधर्मातील प्रत्येक संप्रदायात तत्त्वज्ञान आणि आचार वेगवेगळे असल्यामुळे त्यांची परस्पर तुलना करून कोणाला श्रेष्ठ कनिष्ठ ठरविण्याच्या ऐवजी परस्परातील साम्य लक्षात घेऊन वैर नष्ट केले पाहिजे. या दृष्टीने आपण फक्त जैन मतातील व वैदिक मतातील महाराजांनी मांडलेली साम्य स्थळे व भेद पाहू.

१) आनंदगिरींनी बद्ध, मुक्त व नित्यसिद्ध असे जैनमतातील जीव मानून त्यातील नित्यसिद्ध जीव म्हणजे अर्हत् मुनी हेच ईश्वर होत असे दाखवून जैन मताचे एकीकडे खंडन केले व दुसरीकडे जैनमताचा वेदान्तांशी समन्वयही साधला. पण - तीन जीव मानल्यास महत्वाच्या

बाबी सोडून द्याव्या लागतात म्हणून जैनानी अत्यंत एकोप्याने आपल्या सर्व ग्रंथांतून बदल केलेला असावा, असे महाराजांचे मत आहे.[२३]

''प्राचीन कुंदकुंदाचार्यांचा **'समयसार'** ग्रंथ आणि क्षुल्लकजीकृत **'सम्यक्ज्ञानदीपिका'** या दोन ग्रंथात शांकरवेदान्त मिसळलेला आहे. सम्यक्ज्ञान दीपिकेत तर 'हा ग्रंथ वैदिक व जैन या दोघांनाही पटण्यासारखा आहे'' असे म्हटले आहे[२४]

महाराज म्हणतात - पुष्कळ दिवसापूर्वी मला जैन लोकांचे एक उपाध्याय भेटले होते. ''अर्हन्त व मुक्त झालेले इतर जीव यांना आम्ही सारखे मानीत नाही असे त्यांचे म्हणणे होते.'' यावरून असेच दिसते की जैन मतातील नित्य मुक्त जीव 'अर्हन्त' हाच ईश्वर मानला की वेदान्ताशी समन्वय होतो.

जीवास्तिकायः पुनस्त्रिविधः । बद्धो, मुक्तो नित्यसिद्धश्चेति । तत्र अर्हन्मुर्नित्यसिद्धः नित्यसाधर्नेर्मुक्तत्वात् । इतरे केचन साधनैर्मुक्ता । अन्ये तु बद्धा इति भेदः।। याप्रमाणे वेदान्ताशी समन्वय होतो.

२) जैन मतात ईश्वरावाचून आपल्या बळानेच जीव तरू शकतो असा कर्मवाद घेतला आहे. तो निरीश्वर मीमांसेच्या वैदिक कर्मवादाला जुळता आहे.

* म्लेच्छमतात 'कर्मावाचून' सर्व पापे परमेश्वर क्षमा करतो असे म्हटले आहे.

* पण वैदिक मतात भगवान प्रार्थनेने भक्तांच्या अपराधांची क्षमा करून त्याला त्याच्या ''सत्कर्मानेच'' त्याला शुद्ध करतो, असे म्हटले आहे.

३) जैन धर्मग्रंथात जन्माने जातिवाद मानला असून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चारी वर्णांचे कडक नियम दृष्टीस पडतात.

* मूर्तिपूजक श्वेतांवर जैनाचार्य हेमचंद्र सूरिप्रणीत अर्हन्नीति,या ग्रंथात ब्राह्मणांनी शूद्रांशी व्यवहार केल्यास जैनधर्मात प्रायश्चित घ्यावे लागते.[२६]

* शूद्रांनी वेद म्हणू नये असे ब्राह्मणांचे म्हणणे जे आहे ते केवळ स्वरासहित अक्षरांविषयी आहे. अर्थाविषयी मुळीच नाही.[२६] पुराणादिकावरून वेदांचा अर्थ व ब्रह्मज्ञान शिकून त्यांनाही मुक्तीचा मार्ग सांगून ठेवला आहे.

४) दिगंबर जैन पंथात तर स्त्रियांना मोक्षच होत नाही असे म्हटले आहे. स्त्रियांना नमस्कार करण्याचाही निषेध आहे.[२७]

* परंतु वैदिक धर्मात भाषांतरादि वाचून स्त्रियांना व इतर वर्णांना देखील मोक्ष होतो असे मानले आहे.[२८]

५) तीर्थंकर व महात्मे, ब्राह्मण जातिशिवाय वैश्य व शूद्र जातीमध्ये उत्पन्नच होत नाही असे म्हटले आहे. कर्माच्या योगाने उत्तम शरीर घेणाऱ्यालाच शेवटी तीर्थंकराचे उत्तम शरीर मिळते. एकूण काय तर सर्व जाती जन्मानुसारच मानल्या आहे.[२९] (तत्त्वनिर्णय प्रसाद व जैनव्रतादेश व जैन तत्त्वादर्श)

६) हिंदु व जैनांचे गोरक्षणाचे बाबतीत पूर्णपणे एकमत आहे.

७) मंत्रशास्त्र जैनांमध्ये आहे. पद्मावत्यादि मंत्रांचे फार सामर्थ्य असून ते फळतात. हे हिंदुधर्मानुसारच आहे.

८) मौजीबंधन जैनात आहे व वैदिकांतही आहे.

९) श्वेतांवर पंथात मात्र स्त्रियांना मोक्ष सांगितला आहे. हे वैदिक धर्माप्रमाणेच दिसून येते.[३०]

१०) समयसार या ग्रंथात वेदान्तातील ब्रह्माचा

समन्वय झाला आहे.

उदयति न नयश्रीरस्तमेति प्रमाणं क्वचिदपि च न विघ्नो याति निक्षेपचक्रम् । किमपरमभिदध्मो धाम्नि सर्वंकषेऽस्मिन् अनुभवमुपयाते भावि न द्वैतमेव ।।

यामध्ये समाधीत आत्मप्रत्यय असून द्वैत काही भासत नाही असा अर्थ आहे.

११) जैन मतात अर्हन्ताला अनन्तशक्तिमत्ता, अनंतदयालुता मानली आहे. तसेच आवरणरहित सर्वज्ञतः आहे.

सर्वज्ञो जितरागादिदोषस्त्रैलोक्यपूजितः ।
यथास्थितार्थवादी च देवोऽर्हन्तपरमेश्वरः ।।

(इति निश्चयालंकारे विद्यारण्यकृत सर्वदर्शन संग्रह)

वैदिक ईश्वर नित्यशुद्ध, मुक्त, सर्वज्ञ, सर्वशक्ति, दयालु असाच आहे.

याप्रमाणे महाराजांनी अनेक साम्य स्थळे दाखवून दिली आहेत. त्यामुळे समन्वय सहज होतो. महाराजांनी संप्रदायसरतरू, सांख्यसुरेंद्र यष्टी १४ व पत्रे यांत जैनमताचे खंडनही बरेच केले आहे. पण ज्याप्रमाणे अद्वैत मताच्या ग्रंथामध्ये इतर सर्व द्वैतवादियांची मते खंडन केली असली तरी त्यांचेहिंदुत्व नाहीसे होत नाही. त्याप्रमाणे जैन पंथाचेही हिंदुत्व नाहीसे व्हावयाचे

कारण नाही. काही अवैदिक आचार व सिद्धांत मांडले असले तरी मूळ गाभा हिंदुधर्माचाच आहे असे महाराजांनी केलेल्या समन्वयावरून लक्षात येते.

<u>बौद्ध दर्शन</u>

<u>अवताराचे प्रयोजन</u>

आपल्या आर्यधर्मात भगवान् गौतम बुद्धांनाही विष्णूचा ९ वा अवतार मानतात. दुष्टांचे निर्दालन आणि सज्जनांचे पालन करून वैदिक धर्माची पुनःस्थापना करणे हे अवताराचे प्रयोजन असते. वैदिक धर्माची शुद्धी करताना दुष्टांचा प्रत्यक्ष संहार, किंवा असुरांना मोह पाडून धर्माची शुद्धी करणे या दोन गोष्टी येतात.

असुरांना मोह पाडण्याचे कार्य अमृतमंथनाच्या वेळी आणि भस्मासुराला मारण्याचे वेळी विष्णूचे मोहिनीचे रूप घेऊन केलेले आहे.

त्याचप्रमाणे कलियुग सुरू झाल्यानंतर राजे उन्मत्त होऊन यज्ञसंस्थेच्या नांवाने यज्ञात भयंकर हिंसा करू लागले व खरा सात्त्विक वैदिक धर्म दूषित होऊ लागला, म्हणून बुद्धावतार घेऊन विष्णूंनी त्यांना अहिंसेचा उपदेश केला. व नवीन पंथ काढून धर्माची शुद्धी केली. पुढे या पंथाचा विस्तार अफाट झाला व मूळ वैदिक

धर्माचा संकोच होऊ लागला म्हणून शंकराचार्यांनी युक्तिवादपूर्वक खंडन-मंडन करून पुनः व्यापक दृष्टी असलेल्या वैदिक धर्माची स्थापना केली. त्यांना बौद्ध तत्त्वे तरी अमान्य असली तरी बुद्धावतार मान्य होता म्हणूनच त्यांनी वैदिक कर्मातील ''बौद्धावतारे श्रीरामक्षेत्रे...'' वगैरे संध्या, पूजा, होमहवनादि नित्यनैमित्यिक सर्व कर्म-उपासनांतील संकल्प चालूच ठेवले आणि अजूनही ते तसेच कायम आहेत.

त्याचप्रमाणे महाराजांनीही -

* बौद्धधर्माचा अभ्यास कसा करावा,
* बुद्धाचे अवतारत्व,
* बौद्धमतातील ईश्वरविषयक मते,
* सर्व शून्यादि चार भावना,
* नागार्जुनादि बौद्ध आचार्यांनी केलेला शून्य शब्दाचा अर्थ,

वगैरतीले सर्व प्रकारचे भेद-साम्य दाखवून शेवटी समन्वय केलेला आहे. हा सर्व विषय संप्रदाय सुरतरू, साधुबोध, रुक्मिणी पत्रिका, सांख्यसुरेंद्र वगैरे अनेक ग्रंथातून विस्ताराने आला आहे.

(६५)

नवे अभ्यास सूत्र

महाराजांनी बौद्ध धर्माचा अभ्यास कसा करावा. त्याचे एक मार्मिक सूत्र सांगितले आहे.

आपुलेचि केले आपणा फळे । निर्वाण तंव अद्वैत ब्रह्मचि उगळे । हे हृदयी धरोनी मोकळे । बौद्धधर्माध्ययन कीजे ॥८३५॥

आपल्या भावनेनेच फळ आपल्याला मिळते. आपण शून्य भावना केली तर शून्याचाच अनुभव येईल. पण तो अद्वैतरूपी जाणीव-नेणीव रहित अशा आत्म्याचाच अनुभव असतो. पण या आत्म्याच्या अस्तित्वावर 'काही नाही' असा शून्याचा खोटा आभास आपल्या भावनेमुळेच होतो. म्हणूननिर्वाण म्हणजे अद्वैत ब्रह्मच आहे हे समजून मग बौद्ध धर्माचे अध्ययन करावे म्हणजे बुद्धधर्माचे रहस्य उत्तम आकलन होऊ शकते, - असे हे अभ्यासाचे नवे सूत्र सांगितले आहे.

गौतमबुद्धांचे अवतारत्व

भगवान् बुद्धांचे अवतारत्व यासंबंधी महाराजांनी साधुबोधात प्रश्नोत्तर रूपाने मार्मिक आणि मोजक्या शब्दात चर्चा केली आहे. त्याचा सारांश पाहूः

(६६)

* ''बुद्धाविषयीची पूज्यबुद्धी बौद्धपंथीयांपेक्षा इतरांना जास्त आहे असे महाराज म्हणतात. कारण बौद्ध त्याला मनुष्य समजतात तर आम्ही त्याला देव समजतो.

वैदिक अवतारत्वाची परीक्षा -

१) एक तर तो पुराणात विशेष रीतीने सापडला पाहिजे किवा

२) गीतेत सांगितलेले सामान्य लक्षण त्याचे अंगी असले पाहिजे.

३) वैदिक धर्मासाठी महत्कार्य त्याचे हातून झाले पाहिजे.

पुराणे व जातकांचा समन्वय

भगवान् गौतम बुद्धांना पुराणात अवतार म्हटले आहे व बुद्ध जातकात त्यांच्या पूर्वजन्मीच्या अनेक कथा सांगितल्या आहेत व त्यातील काही बुद्धांनी स्वतः सांगितल्या आहेत. महाराजांनी विभूतियोगाने या दोन्ही पक्षांचा समन्वय केला आहे.–

बुद्धजातकातील नायक विष्णूच्या विभूति असून बुद्ध हा अवतार आहे त्यामुळे विरोध येत नाही असा महाराजांनी समन्वय केला आहे.

(६७)

ईश्वर विषयक दृष्टिकोण

बुद्ध ईश्वर मानीत होते परंतु त्याचे स्वरूप अज्ञेय आहे असे म्हणत होते - 'ईश्वर आहे की नाही अशा गोष्टी मला विचारू नका' - असे त्यांनी आपल्या शिष्यांना उत्तर दिले आहे व या प्रश्नाचे उत्तर शिष्यांवरच सोपविले आहे. मांडुक्य पुत्ताला तर बुद्धांनी असे सांगितले आहे की

'मी जेवढे प्रकट केलेआहे तेवढे प्रकट होऊ द्या व जेवढे गुप्त ठेवले आहे तेवढे गुप्त राहू द्या'.

यावरूनही जगताचा कर्ता ईश्वर वगैरे कोणी नाही असे बुद्धांनी स्पष्ट सांगितले नाही म्हणून 'मौनं संमतिलक्षणम्' असे समजून चालावयास मुळीच हरकत नाही.

गौतम बुद्धांचे वैदिकत्व

गौतम बुद्ध वैदिक मताचे अनुयायी होते कारण 'वेदांचे अर्थ जाणल्यानेच ब्राह्मण होतो' असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. त्यांनी हिंसात्मक यज्ञमंत्रांचीच निंदा केली असून ज्ञानकांडात्मक वेदामंत्रांची निंदा केलेली नाही. असा गीतागोविंदाचाही आशय आहे.

बौद्ध धर्मात जन्मजातिव्यवस्था मानली नसून गुणकर्मानेच जाती मानल्या आहेत.

(६८)

न जच्चा वसलो होती, न जच्चा होति बाम्मणो ।
कम्मणा वसलो होती, कम्मणा होति बाम्मणो ॥

संस्कृत छाया -

न जात्या वृषलो भवति,न जात्या भवति ब्राह्मणः ।
कर्मणा वृषलो भवति, कर्मणा भवति ब्राह्मणः ॥

ब्राह्मणत्व शूद्रत्व वगैरे जन्माने येत नसून कर्माने येत असते असा गुणाकर्मवादाचा पक्ष बुद्धांनी स्वीकारला आहे. हिंदुधर्मातील जातिभेद आवडत नाही म्हणून बौद्धधर्म स्वीकारला तरी गुणकर्मानुसार जाती मानाव्याच लागतात. असे गुणकर्मानुसार असलेले चातुर्वर्ण्य हे हिंदुधर्माचेच एक लक्षण बौद्ध धर्मातही आलेले आहे.

मान्य तत्त्वे

शंकराचार्यानी बौद्धांच्या अधिप्रज्ञाशिक्षेचे खंडण केलेले आहे. ईश्वरासंबंधीबुद्धांनी मौन पाळले असल्याने त्यासंबंधी खंडणमंडन केलेनाही. आणि अधिचित्तशिक्षेचे जे खंडन आहे ते अधिप्रज्ञाशिक्षेला धरूनच आहे.

अधिशील शिक्षेचे खंडन कुमारिलभट्टांनी चमत्कार दाखवून केले आहे. वादपूर्वक नव्हे. शिवाय बुद्धांची अधिशील शिक्षाही आर्य ग्रंथातीलच असल्यामुळे महाराजांना ती मान्य आहे. तिच्यात वैदिक सामान्यधर्मापेक्षा अधिक असे काही वेगळे नाही तसेच -

(६९)

त्रिपित्तकापैकी सूत्तपित्तकातच बुद्धाचा जशाचा तसा उपदेश आला आहे, म्हणूनहिंदुधर्मात सूत्तपित्तकाचे खंडन सापडत नाही असे महाराज म्हणतात.

चार भावना

स्वामी विद्यारण्यांनी सर्वदर्शनसंग्रहात असे म्हटले आहे की,

''यद्यपि भगवान् बुद्ध एक एव बोधयिता तथापि बोद्धव्यानां बुद्धिभेदात् चातुर्विध्यम्''

यावरून गौतम बुद्धांच्या शिष्यांना, त्यांचे मत बरोबर समजले नाही असे स्पष्ट म्हणता येते. महाराजांनी बौद्धांच्या चार भावनांचा योगशास्त्र दृष्ट्या उत्तम विचार करून विद्यारण्यांचे मतच कसे बरोबर आहे हे दाखवून दिले आहे.

चार भावना

१- सर्व क्षणिकं क्षणिकम् । २- सर्व दुःखं दुःखम् ।
३- सर्व स्वलक्षणं स्वलक्षणम् । ४- सर्व शून्यं शून्यम् ।

अशा या चार भावना वैराग्याकरता सांगितल्या आहेत. पण भावनेप्रमाणे वस्तू असतेच असा नियम नाही अशाच भावना पतंजलींनी जगाला स्वप्नरूप समजावे किंवा स्वप्नाचे ध्यान करावे म्हणून मनाच्या स्थिरतेकरता

(७०)

सांगितल्या आहेत. पण तेवढ्यानेच त्यांचे अनुयायी जगन्मिथ्यात्व किवा स्वप्नसत्यत्व समजत नाहीत. बुद्धांनीही या चारी भावना वस्तुत्वे करून सांगितलेल्या नसून योग सिद्धीसाठी सांगितल्या आहेत असे म्हणता येते.

१) सर्व क्षणिक आहे, ही भावना सर्व विषयांचा नाश होणार आहे, या उद्देशाने सांगितली आहे.

२) दुःखाची भावना, वर्तमान विषयात दोष दिसण्यासाठी सांगितली आहे,

३) स्वलक्षण भावना, योगातील शम साधल्या नंतर पुनः त्याचा नाश होऊ नये म्हणून सांगितली आहे.

४) शून्यभावना निर्विकल्पसमाधी साध्य होण्या-करता सांगितली आहे.

* अभावयोग म्हणून 'कूर्म पुराणातील ईश्वरगीते'तही अशीच भावना सांगितली आहे.

* 'विद्यारण्यां'नी बुद्धदर्शनातील शून्य हे सद् असद् कोटिरहित आहे असे दाखविले आहे.

अशा प्रकारे ''या चारी भावना योगाच्या असून बुद्धांच्या शिष्यांनी मात्र त्या भावनांचा तत्वज्ञान म्हणून विचार केला.''

(७१)

बौद्धातील अन्तःकरणचिन्हे उत्तम आहेत पण या शून्यवादामुळे निरात्मवाद व निरीश्वरवाद या दोन गोष्टी बौद्ध धर्मात संग्रहीत झाल्यामुळे मूळ (वैदिक) धर्माशी भेद झाला आहे.

या शास्त्रातील शून्यवादाचा व वेदान्तातील ब्रह्मवादाचा समन्वय योगवासिष्ठकारांनीही थोडासा केला आहे. भगवद्भक्तिसौरभात महाराज म्हणतात.

बौद्धांचे शून्य आमुची चिती । एकचि ऐसे वसिष्ठ म्हणती । बृहद्वासिष्ठीं बहुत असती । श्लोक ऐसे ।।७५।। आणि ब्रह्मास शून्य शब्द । ज्ञानेश्वर्यादि स्थानी प्रसिद्ध । तातही विशद । बहुधा बोलिले ।।७६।। अमृतानुभवी चतुर्थाध्यायीं । शून्य शब्दार्थ जो खंडिला पाही । तो अभाव शून्य समजती, तयाही । व्हावया बोधू ।।७७।।

योगवासिष्ठात - शून्य म्हणजेच वेदान्ताचे ब्रह्म होय या अर्थाचे अनेक श्लोक आहेत.

ज्ञानेश्वरीतही ब्रह्माला शून्य म्हटलेले आहे. पण तेथे शून्य याचा अर्थ आत्म्याचा अभाव, असा नसून, जगताचा अभाव, असा अर्थ आहे. 'अमृतानुभवा'तील शून्याचे खंडन जे केले तेही त्याच अर्थाने आहे.

शून्याचे अस्तित्व : वदतो व्याघात्

(७२)

वादी म्हणणे तुम्ही । विश्वास ठेवावा बौद्धशून्यावरी । सिद्धांती म्हणजे विश्वास ठेविता निर्धारी। शून्याचे शून्यपणचि जाय ।।११५।। विश्वास जेथ जेथ आहे । तेथ तेथ 'भावो'चि उत्पन्न होये । हे असो, **नागार्जुन स्वये बोलताहे । की बौद्ध शून्य ते वेदान्त ब्रह्म** ।।११६।।

शून्यावर जर विश्वास ठेवला तर शून्य भावपदार्थ होईल म्हणजे शून्याला सत्ता किंवा अस्तित्व मानावे लागेल. आणि शून्याला सत्ता आल्याने त्याचा शून्यपणा नाहीसा होईल. तसेच बौद्धाचार्य नागार्जुन देखील म्हणतात की बौद्धांचे शून्य व वेदान्ताचे ब्रह्म सारखेच ! असो -

सर्वालंबनधर्मैश्च सर्वतत्त्वैरशेषतः।
सर्वक्लेशाशयैः शून्यं, न शून्यं परमार्थतः।।

जगातील सर्व धर्म व धर्मी, क्लेश आणि वासना यांनी विरहित असल्यामुळे त्यांना शून्य म्हटले आहे. - असत् आहे म्हणून शून्य शब्द वापरलेला नाही. बौद्धांच्या आलोकमाला ग्रंथातही असेच म्हटले आहे की,

विरुद्धत्वात्तमोवृत्तेर्नावकाशं ददाति या ।
सावस्था कापि विज्ञेया, न हि सा शून्यतोच्यते ।
न पुनर्लोकरूढ्यैव नास्तिक्यार्थानुपातिनी ।।*आलोकमाला*

(७३)

विरुद्ध अशा तमोवृत्तीला अवकाश न देणारी अवस्था शून्यशब्दाचा अर्थ आहे. अत्यंत असत्पणा म्हणजे अत्यंत अभाव असा लोकात रूढ असलेला अर्थ आम्ही घेत नाही. याप्रमाणे नागार्जुन व आलोकमालाकारांनीही शून्य शब्दाचा अर्थ वेदान्तब्रह्मपरच केला आहे. एकूण काय तर-

१) वेदांतातील ब्रह्म व शून्याचा समन्वय आहे.

२) शून्यवादाचा व विज्ञानवादाचाही महाराजांनी समन्वय केला आहे.

३) शून्यावरील भ्रमपक्ष वेदान्ताचा पर्याय आहे.

४) किंवा न्यायाचा पर्यायआहे.

५) सर्वास्तित्ववाद अज्ञ मूर्खांच्या मोक्षप्रवृत्तीला वाढविणारा आहे. असे महाराजांनी मांडले आहे. परंतु अनधिकारी पुरुषांना हे मोहामुळे समजत नाही व ते भेद माजवितात असे महाराजांचे स्पष्ट मत आहे.

काल प्रत्ययही क्षणिक

सर्वं क्षणिकं प्रत्ययात कालप्रत्ययही क्षणिक ठरतो. त्यामुळे कालावर अवलंबून असलेलेक्षणिकत्वच सिद्ध होत नाही.

काल नित्य मानल्यास जे कालाला ईश्वर

(७४)

समजतात त्यांच्या मताचा बौद्धमतात कसा तरी प्रवेश होतो. ''सर्वच अविद्यामय असल्यामुळे शून्यास ब्रह्म मानल्यास बौद्ध व वेदान्त मतात विरोध येत नाही'', असे संप्रदाय सुरतरूत महाराजांनी विवेचन केले आहे.

अधिकार भेदाने समन्वय

याप्रमाणे बौद्ध तत्त्वज्ञानाचा खोलवर विचार केल्यानंतर समन्वय दिसून येतो. मेरूतंत्रात तर अधिकारभेदाने बौद्धमताचे प्रामाण्य उत्तम रीतीने सिद्ध केले आहे व ''स्वधर्मच्युत झालेल्या सर्वांनी भगवान विष्णूच्या बुद्धावताराची षोडशोपचारांनी पूजा व उपासना करून मुक्ती मिळवावी'' असे सांगितले आहे.

अथातः संप्रवक्ष्यामि बौद्धमंत्रमहाफलम् ।
सभ्यत्वात् द्विजातीनामधिकारोऽस्ति कर्हिचित् ॥१३१४॥
वाममार्गरताः विप्राः कुण्डकाः जातिविच्युताः ।
हीनाः वेदसंस्कारैः प्रमादात् म्लेच्छतां गताः ॥९३१५॥
बुद्धं विष्णुं समभ्यर्च्य भुक्तिं मुक्तिं प्रयांति ते''॥ *मेरुतंत्र प्रकाश१६*

याप्रमाणें अनेक संदर्भ-श्लोक महाराजांनी संप्रदायसुरतरूत प्रमाण घेऊन विवेचन केले आहे. या सर्व श्लोकांचे तात्पर्य येवढेच की -

(७५)

'सकाम पुरुषांनी सहपरिवार बुद्धाचे पूजन करावे. निष्काम पुरुषाने केवळ मंत्रच जपला तरी चालेल. पण दोघांनीही बुद्धाचे ठिकाणी परमेश्वरभावना मात्र अवश्य करावी.'

याबद्दल महाराज म्हणतात - ''याप्रमाणे आम्ही बुद्धाला देव समजून नमस्कार करतो तसाच जर बौद्ध लोकही करतील तर या जन्मी ते भागवत असूनजन्मांतरी ते पूर्ण भागवत होतील''

हिंदूंच्या वाममार्गी संप्रदायातील लोकांनाही बौद्ध धर्मानेच सद्गती सांगितली आहे. कारण वाममार्गापेक्षा बौद्ध धर्मातील अन्तःकरण धर्म उत्तम आहेत. व आचारदृष्टीनेही बौद्धाचारच उत्तम आहे असे महाराज म्हणतात कारण -

मद्य, मांस, मीन, मुद्रा आणि मैथुन यांना धर्मात स्थान देण्यासारखे भयंकर प्रकार बुद्धधर्मात नाहीत. बौद्धांना जर आर्यधर्मात येण्याचे जन्मांतर लागणार असेल तर वाममार्गियांनाही लागलेच पाहिजे असे त्यांचे मत आहे.

एकूण काय तर कर्मपंथाने आर्यधर्मात येण्यास अदृष्ट कारणास्तव जन्मांतर लागते पण भक्तिपंथात मात्र कोणीही केव्हाही येऊ शकतो. तपाने ब्राह्मणपणा

(७६)

मिळविण्यास जात्यंतर परिणामाची आवश्यकता आहे तशी ईश्वर मिळविण्यास नाही. याप्रमाणे महाराजांनी प्राचीन परंपरा खंडित होऊ न देता सर्व धर्मांचा समन्वित विचार केला आहे. आणि शेवटी -

''सर्वथा स्वभोगाचा व स्वाहंकाराचा त्याग करून तीव्र भक्तीने सर्वच भगवंताला अर्पण केले जाईल तर - कोणतेही कर्म भागवत धर्मातच अन्तर्भूत होते.'' असा मार्मिक निर्णय दिला आहे.

आतापर्यंत आपण पाहिले की हिंदुधर्म बुद्धधर्माला परका समजत नाही. शंकराचार्यांनी ज्या शून्यवादाचे खंडन केले आहे. त्या शून्याचा ब्रह्मपर अर्थ केला तर मग त्यांचाही विरोधराहत नाही. शंकराचार्य बुद्धाच्या अवतारत्वाचे खंडन करीत नाहीत किंवा त्यातील अहिंसेचेही खंडन करीत नाहीत.

* श्रीज्ञानदेवांनीही शून्य म्हणजे अभाव, याच अर्थाचे खंडन केले आहे.
* नागार्जुनादि बौद्ध महात्म्यांनी शून्य म्हणजे वेदान्ताचे ब्रह्म असा अर्थ स्वीकार केला आहे.
* ईश्वराबद्दल बुद्धाने मौन धारण केले आहे.

या सर्व दृष्टींनी विचार केला असता असे

(७७)

दिसून येते की, व्यापक अशा हिंदुधर्मांच्या अहिंसा व सत्य या तत्त्वांवर म्हणजे एकेका अंशावर आधारलेला हा पंथ आहे. परंतु गौतम बुद्धानंतर इतरांनी या हिंदुधर्माच्याच अंतर्गत असलेल्या या पंथाला वेगळेपण दिला आणि हिंदुधर्मापासून अगदी विभक्त केले म्हणून याला ''परधर्मत्व'' आले असे म्हणावे लागते.

खरे पाहिले असता धर्माच्या नावाखाली यज्ञामध्ये हिंसेचे थैमान सुरू झाले, लोकांची अधोगती सुरू झाली. हे अधःपतन भगवान् गौतम बुद्धांना पाहवले नाही म्हणून त्यांनी अहिंसेचा उपदेश केला. लोकांना करुणामय असा अहिंसेचा मार्ग दाखविला. **अवतार जरी एक विसावा । परी करुणेचा पूर्ण विसावा । अहिंसेचिया पूर्ण भावा । प्रगटविले जेणे ॥** *(भागवतरहस्य. श्रीगुलाबराव महाराज)*

समारोप

महाराजांनी जगातील सर्व धर्म किंवा सर्व पंथ हे आर्यधर्माच्याच एकेका अंशावर स्थित आहेत हे दाखवून दिले आहे. फडा-केरसुणी यांच्या पूजेपासून देवदेवतांच्या पूजा, द्वैतमार्ग व शेवटी जीवेशांचे ऐक्यापर्यंत तत्त्वज्ञान सांगणारे असंख्य धर्म जगात आहेत. ह्या सर्वांचा समन्वय सनातन अशा हिंदुधर्मात होतो.यावरून आर्याचा धर्म किती

(७८)

व्यापक व सर्वसंग्राहक असला पाहिजे याची कल्पना येते.

त्यातही असे की मुसलमान, ख्रिश्चन वगैरे लोक इतर धर्मांचा द्वेष करतात तर आर्य लोक त्याचा द्वेष न करता त्या सर्व धर्मांची- पंथोपपंथांची संगती लावतात. यातच आर्यधर्माचे श्रेष्ठत्व, सर्वंकषत्व आणि व्यापकत्व स्पष्टपणे दिसून येते.

प्रत्येक मनुष्यासाठी परमेश्वराने उन्नतीचा मार्ग दिला आहे. प्रत्येकाला परंपरेने प्राप्त झालेला धर्म हा त्याचा स्वतःचा धर्म असतो. तो आचारधर्म सोडून इतरांचे कर्म स्वतःसाठी धर्म म्हणून स्वीकारणे गीतेलाही संमत नाही.

परधर्मो भयावहः

स्वतःचा धर्म सोडून दुसऱ्याचा धर्म स्वीकारण्यात पहिलेपासूनअसलेली आपली श्रद्धा भंग पावते आणि ते श्रद्धाहीनत्व अत्यंत अधोगतीला नेणारे होते. म्हणून सात्त्विक असणारा आचारधर्म तोच कायम ठेवून तत्त्वज्ञान व भक्ती मात्र सर्वांनी ग्रहण करण्यास योग्य आहे, असा महाराजांचा निर्णय आहे. काही काही ठिकाणी तर

(७९)

महाराजांनी अगदी बिनतोड युक्तिवाद केले आहेत.-

साधुबोधातील प्रश्नोत्तरे

प्र.: सर्वधर्म समान आहेत तर आपल्या धर्मात का रहावे?

उ.:सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्माला कां सोडावे?

प्र.:- धर्मात आज्ञा श्रेष्ठ आहे की प्रेम?

उ.:- भगवंताचे ठिकाणी प्रेम व इतरत्र आज्ञा.

प्र.:- धर्मांचे मुख्य लक्षण कोणते?

उ.:- शास्त्राज्ञा.

प्र.:- अहो पण तांत्रिकधर्मात मलमूत्रांचादेखील उपयोग सांगितला आहे?

उ.: तेथेही तो धर्म आज्ञामूलकच आहे. लोकव्यवहार मूलक नाही कारण नाखुशी असली तरी तोही धर्म पाळलाच पाहिजे असा त्याही आज्ञेचा अर्थ आहे. म्हणून लोकव्यवहारावरून धर्म बसविणे फाजील खुशी बाळगणाऱ्याचे काम आहे, शहाण्याचे नाही.

प्र :- धर्मशास्त्रात वेश्यांसारख्या पापी लोकांनाही धर्म कां सांगितला आहे?

(८०)

उ. :- धर्माधर्माचा असा एक नियम आहे की स्वतःहून जबरदस्तीने अधर्म केला तर गती नाही. पण अधर्माच्या परिस्थितीत जन्माला आल्यास मात्र त्याला धर्मात येण्यास मार्ग आहे. कारण तो कर्मपरतंत्र होऊन जन्मास येत असतो. जी प्रत्यक्ष कुलटा आहे तिला धर्म नाही पण वेश्येच्या मुलीला मात्र धर्म सांगितला आहे. ०००

याप्रमाणे अनेक प्रश्नोत्तरे व धर्माधर्मासंबंधी सूक्ष्म विचार श्री गुलाबराव महाराजांच्या वाङ्मयात असंख्य सांपडतात. त्यापैकी काहींचा अतिशय संक्षेपाने विचार करून महाराजांनी मांडलेली हिंदुधर्मातील धर्मसमन्वयाची व्यापक भूमिका जाणून घेण्याचा हा प्रयत्न !

कृते समन्वये यः स्याद् भेदे ह्याग्रहवान् यदि ।

गुणे दोषारोपकत्वात् स सासूयो न संशयः ॥

(शास्त्रसमन्वयः श्लो. ६)

*

श्रीमत्सद्गुरु श्रीबाबाजीमहाराज पंडित

यांचे चरणी समर्पण !

*

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचा

धर्मसमन्वय-विचार

कृते समन्वये यः स्याद् भेदे ह्याग्रहवान् यदि ।
गुणे दोषारोपकत्वात् स सासूयो न संशयः ॥

(शास्त्रसमन्वयःश्लो.६)

रु. १०

— डा. कृष्ण माधव घटाटे

मौलिक विचार माला - २५

श्रीगुलाबरावमहाराजांचा

धर्मसमन्वय-विचार

हिंदुधर्माचा सर्वसमावेशक उदार भूमिका



डॉ. कृष्ण माधव घटाटे

श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ दहीसाथ अमरावती

अनुक्रम

सर्वधर्मसमन्वय विचार ५
धर्म आणि पंथ १०
अधिकार तैसा उपदेश १६
वैदिक / अवैदिक धर्म १६
समन्वयाचे ९ प्रकार १९
समन्वयाचे लक्षण २७
वैदिक १६संप्रदायांचा समन्वय २९
हिंदुधर्माची इतरांशी तुलना ३३
सर्व धर्मांची वैदिक ऋषींकडून स्थापना ३५
धर्म समन्वय व धर्म संकर ३७
हिंदुधर्माचे पुरातनतत्व ३९
हिंदुधर्म कां राहिला ? ४०
ख्रिश्चन ४१
* समान तत्त्वे ४३
* इतर धर्मातील अतिरेक ४३
हिंदू धर्म टिकण्याचे कारण
इस्लाम ४७
* विचार एक, आचार भिन्न ५०
* साम्यस्थळे ५२
जैन दर्शन ५७
बौद्ध दर्शन ६३
* अभ्याससूत्र ६४
* गौतमबुद्धांचे अवतारत्व ६५
* पुराणे-जातक : समन्वय ६६
* ईश्वरविषयक दृष्टिकोण ६६
* गौतम बुद्धाचे वैदिकत्व ६७
* मान्य तत्त्वे ६८
* चारभावना ६९
* शून्याचे अस्तित्व? ७१
अधिकारभेदाने समन्वय ७४
परधर्मो भयावहः ७८
साधुबोधातील प्रश्नोत्तरे ७९

अनुक्रम

सर्वधर्मसमन्वय विचार ५
धर्म आणि पंथ १०
अधिकार तैसा उपदेश १६
वैदिक / अवैदिक धर्म १६
समन्वयाचे ९ प्रकार १९
समन्वयाचे लक्षण २७
वैदिक १६संप्रदायांचा समन्वय २९
हिंदुधर्माची इतरांशी तुलना ३३
सर्व धर्मांची वैदिक ऋषींकडून स्थापना ३५
धर्म समन्वय व धर्म संकर ३७
हिंदुधर्माचे पुरातनतत्व ३९
हिंदुधर्म कां राहिला ? ४०
ख्रिश्चन ४१
* समान तत्त्वे ४३
* इतर धर्मातील अतिरेक ४३
हिंदू धर्म टिकण्याचे कारण
इस्लाम ४७
* विचार एक, आचार भिन्न ५०
* साम्यस्थळे ५२
जैन दर्शन ५७
बौद्ध दर्शन ६३
* अभ्याससूत्र ६४
* गौतमबुद्धांचे अवतारत्व ६५
* पुराणे-जातक : समन्वय ६६
* ईश्वरविषयक दृष्टिकोण ६६
* गौतम बुद्धाचे वैदिकत्व ६७
* मान्य तत्त्वे ६८
* चारभावना ६९
* शून्याचे अस्तित्व? ७१
अधिकारभेदाने समन्वय ७४
परधर्मो भयावहः ७८
साधुबोधातील प्रश्नोत्तरे ७९

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.